

डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. ०४ फेब्रुवारी २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७५ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# विलीनीकरणाबाबत बोलण्याचा फडणवीसांना अधिकार काय?

## शरद पवारांचा थेट सवाल; अमेरिका करारावरही इशारा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पलटवार केला आहे. ते म्हणाले की, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याबद्दल मला आनंद आहे. अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा झाली होती. मुख्यमंत्री फडणवीस त्या चर्चेत सहभागी नव्हते. मग त्याबद्दल बोलण्याचा त्यांना काय अधिकार होता? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

बारामती येथे झालेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी भारत आणि अमेरिका यांच्यातील नव्या व्यापार कराराबाबत सावधगिरीचा इशारा दिला. कराराचा संपूर्ण मसुदा अद्याप सार्वजनिक झालेला नसला तरी आतापर्यंत समोर आलेल्या बाबींवरून भारतीय शेतकरी आणि कृषी क्षेत्रासाठी चिंता निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः अमेरिकेला भारतात कृषी उत्पादनांची निर्यात करण्याची तरतूद या करारात असण्याची शक्यता त्यांनी अधोरेखित केली. ही बाब देशातील शेती व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम करू शकते, असे त्यांचे मत होते.

या पत्रकार परिषदेत पवार यांनी केंद्रीय अर्थसंकल्पावरही भाष्य केले. संसदेत अर्थसंकल्प सादर होताना आपण नेहमी उपस्थित असतो, मात्र



अजित पवार यांच्या अपघातामुळे यावेळी दिल्लीला जाता आले नाही, असे त्यांनी सांगितले. सभागृहात थेट उपस्थित राहून अंदाजपत्रक ऐकण्याची संधी मिळाली नसली तरी उपलब्ध माहितीनुसार काही मुद्दे लक्षात येतात, असे ते म्हणाले. सामान्य नागरिकांवर नवीन करांचा बोजा टाकलेला नाही, ही बाब समाधानकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तथापि, अर्थसंकल्पातून विकासाला अधिक चालना देणाऱ्या ठोस उपाययोजनांची अपेक्षा होती, असे पवार यांनी नमूद केले. केवळ करसवलती किंवा कर न वाढवणे यापलीकडे जाऊन अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी अधिक ठोस निर्णय आवश्यक होते, अशी त्यांची भूमिका होती. विकास प्रक्रियेला वेग देण्यासाठी आवश्यक असलेले काही निर्णय अर्थसंकल्पात दिसून आले नाहीत, असे ते म्हणाले. भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत बोलताना पवार यांनी अमेरिकेने भारतातून जाणाऱ्या वस्तूंवरील करांमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतल्याचा उल्लेख केला. मात्र या कर कपातीसोबतच कृषी क्षेत्रात अमेरिकेला भारतात निर्यात करण्याची संधी मिळणार असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. अमेरिका हा आर्थिकदृष्ट्या बलाढ्य देश असल्याने त्यांच्या उत्पादनांचा इतर देशांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश झाल्यास स्थानिक उत्पादकांवर त्याचा परिणाम होतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

### शेतकऱ्यांच्या हिताची काळजी घेणे आवश्यक

भारतीय कृषी क्षेत्रावर तसा परिणाम होऊ नये, ही अपेक्षा व्यक्त करत पवार म्हणाले की, कराराचे संपूर्ण चित्र स्पष्ट झाल्यानंतरच सविस्तर भाष्य करणे योग्य ठरेल. सध्या ज्या बाबी जाहीर झाल्या आहेत, त्यावरून शेतकऱ्यांच्या हिताची काळजी घेणे आवश्यक आहे, हे मात्र निश्चित आहे. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने अशा कोणत्याही निर्णयाचा परिणाम व्यापक असतो, याची जाणीव ठेवून पुढील पावले उचलली जावीत, असे त्यांनी सुचवले.

---

## ₹१५०० मध्ये लॅपटॉप

सरकारवर विश्वास ठेवा एका दिवशी दाळ, तेल, साखर, पीठ आदी अन्नधान्य स्वस्त मिळेल!!



## थोडक्यात...

### 'बाहेरची लेक' आता बारामतीची पालक

मुंबई (समर्थ गांवकरी) : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडे बीड आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले आहे. अजित पवारांच्या निधनानंतर या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी कुणाकडे जाणार, याची चर्चा सुरु झाली होती. त्याला या निर्णयाने पूर्णविराम मिळाला. बारामती लोकसभा मतदारसंघ पुणे जिल्ह्यात येतो. त्यामुळे सुनेत्रा पवार त्या अर्थाने तेथीलही पालक असतील. बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळेंच्या विकासकामांचे प्रस्ताव सुनेत्रा पवारांच्या सहीनेच मंजूर होतील. एप्रिल 2024 मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत बारामती मतदारसंघात सुनेत्रा पवारांविरुद्ध सुप्रिया सुळे अशी लढत झाली होती. त्यात सुप्रिया विजयी झाल्या होत्या. त्यानंतर सुनेत्रा यांची राज्यसभेवर नियुक्ती झाली होती. लवकरच त्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देणार आहेत. त्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात शरद पवारांनी सुप्रिया सुळे या मूळ पवार घराण्याची लेक असून सूनबाई सुनेत्रा बाहेरची लेक असल्याचे म्हटले होते.

### केंद्राकडून महाराष्ट्राला 12 वर्षांत 9.49 लाख कोटी रुपयांचा निधी

मुंबई (समर्थ गांवकरी) : केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला 2014 ते 2026 या 12 वर्षांत कर हस्तांतरण आणि अनुदानरुपात 9.49 लाख कोटी रुपये मिळाले. यामध्ये 5.83 लाख कोटी रुपये कर हस्तांतरण तर 3.66 लाख कोटी रुपये केंद्र अनुदानाचे आहेत. केंद्र-राज्य सरकारने दिलेल्या माहितीनुसार 2026-27 या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्राच्या वाट्याला 89,855.80 कोटी रुपयांचा कर वाटा येणार आहे. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी 2009-14 मध्ये वार्षिक सरासरी केवळ 1,171 कोटी रुपये मिळत होते. 2024-25 मध्ये ही तरतूद 15,940 कोटींवर पोहोचली. ही 13 पट वाढ आहे. राज्यात सध्या 81,580 कोटींचे 41 रेल्वे प्रकल्प सुरु आहे.

---

# अर्थखातं घेताच फडणवीसांचा धडाकेबाज आदेश

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

- १५ फेब्रुवारीपासून खरेदीवर टाळेबंदी; फर्निचरपासून सेमिनारपर्यंत खर्च बंद

राज्यातील विविध सरकारी विभागांकडून होणाऱ्या अनावश्यक आणि मनमानी खरेदीवर नियंत्रण आणण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णायक पावले उचलली आहेत. अर्थखात्याची सूत्रे स्वतःकडे घेतल्यानंतर त्यांनी नव्या निविदा काढण्यावर तसेच खरेदी प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यावर तातडीची बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. वित्त विभागाकडून सर्व प्रशासकीय यंत्रणांना कळवण्यात आले आहे की, 15 फेब्रुवारीपासून कोणत्याही प्रकारच्या खरेदी प्रस्तावांना मंजुरी देण्यात येणार नाही आणि नव्या



निविदा प्रक्रियेलाही विराम दिला जाईल. या निर्णयामुळे वर्षअखेरच्या काळात होणाऱ्या खर्चाच्या पद्धतीवर मोठा परिणाम होणार आहे. या आदेशाच्या कक्षेत फर्निचर दुरुस्ती, ड्रायव्हर मशीन, संगणक व इतर उपकरणे, सुटे भाग खरेदी, कार्यालये भाड्याने घेणे, सेमिनार, भौतिक कार्यशाळा अशा अनेक खर्चांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच नियमित प्रशासकीय गरजांच्या नावाखाली होणाऱ्या विविध खरेदींना तात्पुरता 'ब्रेक' लावण्यात आला आहे. मात्र, औषध खरेदीला या निर्बंधातून वगळण्यात आले असून आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाला आवश्यक औषधसाठा खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय केंद्र पुरस्कृत योजना, त्याअंतर्गत राज्य हिस्सा आणि बाह्य सहाय्यित प्रकल्पांतील खरेदी प्रस्तावांना देखील या बंदीतून सूट देण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष संपण्याच्या टप्प्यावर अनेक विभागांकडून उपलब्ध निधी खर्च करण्यासाठी घाईघाईने खरेदी केली जाते, असा आरोप अर्थ विभागाकडून करण्यात आला आहे. केवळ मंजूर निधी परत जाऊ नये, या उद्देशाने वर्षअखेर अनावश्यक वस्तूंची खरेदी होते, असा निष्कर्ष वित्त विभागाच्या आढाव्यातून समोर आला आहे. यामुळे शासनाच्या तिजोरीवर अनावश्यक ताण निर्माण होतो. ही प्रवृत्ती रोखण्यासाठीच हा कठोर निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थखात्याचा सखोल आढावा घेत खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

हा आदेश सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था तसेच नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनाही लागू असेल. त्यामुळे राज्यातील प्रशासनाच्या सर्व स्तरांवर या निर्णयाचा परिणाम दिसून येणार आहे. कार्यालयीन सोयीसुविधा, प्रशिक्षण कार्यक्रम, उपकरणे दुरुस्ती यांसारख्या नियमित खर्चांनाही या निर्बंधाचा फटका बसणार आहे. मात्र, अत्यावश्यक सेवांमध्ये खंड पडू नये याची काळजी घेत औषध खरेदीसारख्या बाबींना सूट देण्यात आली आहे.

---

# महाराष्ट्राच्या शेतीला अमेरिकन 'बळ'; प्रगत तंत्रज्ञानासाठी सरकारतर्फे दौरा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

- महाराष्ट्रातील शेतीमालाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याचा उद्देश

महाराष्ट्रातील शेतीला आधुनिकतेची जोड देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील कृषी उत्पादन, उत्पादकता आणि जागतिक बाजारपेठेतील निर्यात क्षमता वाढवण्यासाठी राज्य सरकारचे एक उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ थेट अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे. विपणन व शिष्टाचार मंत्री जयकुमार जितेंद्रसिंह रावल यांच्या नेतृत्वाखाली हा दौरा पार पडणार असून, याद्वारे महाराष्ट्रातील शेतीला जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान मिळवून देण्याचा सरकारचा मानस आहे. येत्या ९ ते १६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान अमेरिकेत होणाऱ्या जगप्रसिद्ध 'नॅशनल फार्म मशिनरी शो' २०२६ ला हे प्रतिनिधीमंडळ भेट देणार आहे. या प्रदर्शनात जगातील सर्वात प्रगत कृषी यंत्रसामग्री आणि स्वयंचलित तंत्रज्ञानाचे प्रदर्शन भरवले जाते. प्रिसिजन फार्मिंग (अचूक शेती), आधुनिक कापणी यंत्रे आणि मानवी श्रमाचा वापर कमी करणाऱ्या रोबोटिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून ते महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीनुसार कसे राबवता येईल, याचा आराखडा या दौऱ्यात तयार केला जाणार आहे. याचा थेट फायदा राज्यातील शेवटच्या शेतकऱ्याला तंत्रज्ञान स्वरूपात देण्याचे उद्दिष्ट आहे.

---

# सक्षमीकरणातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या महिला शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'गोदरेज ॲग्रोव्हेट' आणि 'महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' (उमेद) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. ९ जिल्ह्यांतील ५ हजार महिला शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचे प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर केले जाणार आहे. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "राज्याच्या विकासात महिला शेतकऱ्यांची भूमिका निर्णायक आहे. करार केवळ तांत्रिक मदत नसून, ग्रामीण भागात लैंगिक समानता व शाश्वत कृषी पद्धती रुजवण्यासाठी घेतलेला संकल्प आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे कापूस उत्पादक पट्ट्यातील महिलांची उत्पादकता वाढून त्यांचे जीवनमान उंचावेल. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने एक निश्चित आराखडा तयार केला असून, त्याची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

लाभार्थी गट: या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील ५,००० हून अधिक महिला शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार असून, १०० महिला स्वयंसहायता गटांना (एसएचजी) याद्वारे संघटित केले जाणार आहे.

क्षेत्रीय व्याप्ती: हा प्रकल्प एकूण ५०,००० एकर शेती क्षेत्रावर राबविण्यात येणार आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर शाश्वत शेतीचा प्रसार होईल.

निवडक ९ जिल्हे : प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील कापूस उत्पादक पट्ट्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

---

# अजितदादांचा शेवटचा संदेश उघड : ८.३७ ला फोन, ८.४६ ला अपघात

## विमानातला अखेरचा कॉल बारामतीत गाजला, अजित पवारांचा शेवटचा आवाज ऐकवला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात निधन झाले. त्या दिवशी सकाळी ते मुंबईहून खासगी विमानाने बारामतीकडे रवाना झाले होते. बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान सकाळी 8.46 वाजता विमान कोसळल्याची दुर्घटना घडली आणि त्यामध्ये अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. या अकस्मात घटनेमुळे राज्यभर शोककळा पसरली. सर्वपक्षीय नेते, लाखो समर्थक आणि चाहत्यांच्या उपस्थितीत 29 जानेवारी रोजी बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेनंतर आज बारामतीमध्ये अजित पवारांचे चुलत पुतणे आणि राष्ट्रवादी



काँग्रेस अजित पवार गटाचे कार्यकर्ते श्रीजीत पवार यांनी पत्रकार परिषद घेत महत्त्वाचा खुलासा केला. त्यांनी अपघातापूर्वी अजित पवारांशी झालेल्या शेवटच्या संभाषणाची ध्वनिमुद्रिका प्रसारमाध्यमांसमोर ऐकवली. या रेकॉर्डिंगमधून अजित पवार अपघातापूर्वी नेमक्या कोणत्या विषयावर बोलत होते, याची माहिती त्यांनी दिली. लँडिंगआधी नेटवर्क उपलब्ध होताच अजित पवारांनी स्वतः श्रीजीत पवारांना फोन केल्याचे त्यांनी सांगितले. श्रीजीत पवारांच्या मते, त्यांनी सकाळी 8 वाजून 19 मिनिटांनी अजित पवारांना एका विषयासंदर्भात मेसेज केला होता. विमान प्रवासात असल्याने नेटवर्क नसल्यामुळे तत्काळ प्रतिसाद मिळाला नाही. मात्र, विमान बारामतीच्या हद्दीत येताच नेटवर्क मिळाल्यानंतर अजित पवारांनी स्वतः कॉल करून त्या मेसेजला उत्तर दिले. हा कॉल सकाळी 8 वाजून 37 मिनिटांनी आला आणि काही मिनिटे दोघांमध्ये संभाषण झाले. त्यानंतर अवघ्या नऊ मिनिटांत म्हणजे 8.46 वाजता विमान अपघाताची घटना घडली.

या शेवटच्या कॉलमध्ये जिल्हा परिषद निवडणुकीतील उमेदवारीच्या संदर्भात चर्चा झाली होती, असे श्रीजीत पवारांनी स्पष्ट केले. सर्व जातीधर्मांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका अजित पवारांनी पुन्हा एकदा व्यक्त केली. आपण सर्वांना न्याय देण्याचं काम करू, असे शब्द त्यांनी फोनवर उच्चारल्याचे श्रीजीत पवारांनी सांगितले. तसेच, माळी समाजाला जिल्हा परिषद उमेदवारी दिल्याचा उल्लेखही अजित पवारांनी या संभाषणात केला होता. इतर पक्षांनी अशी उमेदवारी दिलेली नसताना आपण ती दिली असल्याचे ते म्हणाले होते. श्रीजीत पवारांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, हा कॉल विमानात असतानाच आला होता. अजित पवार बोलत असताना विमान बारामतीत उतरण्याच्या तयारीत होते. 8.37 पर्यंत संभाषण सुरू होते आणि त्यानंतर काही मिनिटांतच दुर्घटना घडली. या वेळांच्या उल्लेखामुळे हा कॉल अपघातापूर्वीचा शेवटचा संवाद ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

---

# मोदी-फडणवीसांना सांगितलेच पाहिजे, हा हट्ट कशासाठी?


## संजय राऊत संतापले; अनावश्यक चिडचिड करू नये, म्हणत पटेलांना टोला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर कडाडून टीका करत महाराष्ट्राच्या राजकारणात नवा वाद निर्माण केला. अजित पवारांनी भाजपसोबत जाताना स्वतःचे विचार खुंटीला टांगले नाहीत; ते पक्ष चालवत होते, असे ठामपणे सांगत राऊतांनी पटेलांवर थेट निशाणा साधला. त्यांच्या मते, अजित पवारांचा पक्ष हा पवार कुटुंबाचा होता, तो कोणाच्याही छायेखाली चालणारा नव्हता. त्यामुळे पटेल यांनी अनावश्यक चिडचिड करू नये, असा टोला त्यांनी लगावला. याच वेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका करत प्रत्येक गोष्ट मोदी-फडणवीसांना सांगितलीच पाहिजे, हा हट्ट कशासाठी? असा सवाल उपस्थित केला.

राऊतांनी उपरोधिक शैलीत विचारले, पटेलांना पवार कुटुंबाचा मुखिया केलं आहे का? त्यांच्या वक्तव्यातून प्रफुल पटेल यांच्याबाबतची नाराजी स्पष्ट दिसून आली. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस चालवत होते, त्यामुळे भाजपची परवानगी घेण्याचा प्रश्नच नव्हता, असे ते म्हणाले. दोन पक्षांत चर्चा झाली, तर त्याची माहिती सर्वांना असलीच पाहिजे हा अनाठायी आग्रह का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. पटेल हे मोदी-शाह यांचे भक्त असल्याचा आरोप करत, महाराष्ट्राला पटेल असंच करा, असा हल्लाबोल त्यांनी केला.

सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्याबाबत बोलताना राऊत म्हणाले, त्यांचे एक पाय नव्हे, तर दोन्ही पाय भाजपत आहेत. या विधानाने त्यांनी राष्ट्रवादीतील काही नेत्यांवर भाजपच्या



जवळीकतेचा आरोप केला. पुढे ते म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा पक्ष अमित शाह यांनी स्थापन केला आहे, अशी उपरोधिक टीका त्यांनी केली. इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड त्यांचे शेअरहोल्डर आहेत, असे म्हणत त्यांनी राजकीय परिस्थितीवर भाष्य केले.

चंद्रपूरमधील राजकीय तिढ्यावरही राऊत यांनी भूमिका स्पष्ट केली. कोणत्याही परिस्थितीत भाजपसोबत जायचं नाही, असे उद्धव ठाकरे यांनी ठरवले असल्याचे त्यांनी सांगितले. भाजपसोबत जाण्याचा प्रश्नच नाही, असा ठाम संदेश त्यांनी दिला. त्यामुळे आगामी राजकीय समीकरणांबाबत शिवसेनेची भूमिका स्पष्ट असल्याचे दिसून आले. राऊत यांच्या या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय हालचालींना नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

भारत-अमेरिका व्यापार करारावरूनही राऊत यांनी केंद्र सरकारवर टीका केली. त्यांच्या मते, आपलं काहीतरी उघडं पडेल या भीतीपोटी मोदींनी अमेरिकेच्या पायाशी आणून ठेवलं आहे.

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल खोटं बोलत असल्याचा आरोप त्यांनी केला. या करारामुळे शेतकऱ्याला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला. परराष्ट्र धोरण आणि संरक्षण धोरण अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प ठरवत आहेत, असा दावा करत त्यांनी देशाच्या सार्वभौमत्वाचा मुद्दा उपस्थित केला.

राऊतांच्या या वक्तव्यांनी राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. प्रफुल पटेल, सुनील तटकरे, देवेंद्र फडणवीस आणि केंद्र सरकारवर एकाच वेळी हल्लाबोल करत त्यांनी विविध मुद्द्यांना स्पर्श केला.

त्यांच्या या विधानांमुळे राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप यांच्यातील संबंधांबाबत नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. पुढील काही दिवसांत या वक्तव्यांवरून राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शेतकरी भवनासाठी १.५२ कोटींची प्रशासकीय मान्यता

## आ. भीमराव केराम यांच्या पाठपुराव्याला यश; शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणारी महत्त्वाची बाब म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवट येथे नवीन शेतकरी भवन उभारण्यासाठी १ कोटी ५२ लाख ७१ हजार २४७ रुपयांच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे.

तालुक्यातील शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी बाजार समितीमध्ये आल्यानंतर त्यांना हक्काचे विश्रांतीचे ठिकाण व मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन" योजनेअंतर्गत



हे भवन उभारण्यात येणार आहे. या कामासाठी आमदार भीमराव केराम यांनी सातत्याने पाठपुरावा करून सदर प्रस्ताव मंजूर करून घेतल्याने शेतकरी बांधवांसह बाजार समितीच्या संचालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि. १९ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार, ज्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवन उपलब्ध नाही किंवा जी भवन जीर्ण अवस्थेत आहेत, त्या ठिकाणी नवीन बांधकाम किंवा दुरुस्तीसाठी शासन अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने उपसंचालक (पणन), पुणे यांनी किनवट बाजार समितीसाठी सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासनाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकानुसार सदर शेतकरी भवनाच्या बांधकामासाठी रॉयल्टी शुल्क, गुणवत्ता नियंत्रण चाचणी शुल्क, आकस्मिकता, जीएसटी, कामगार विमा तसेच इलेक्ट्रिकल चार्जेस यांचा समावेश आहे. एकूण खर्च १.५२ कोटी रुपये इतका असून हा अंदाज सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित आहे.

शेतकरी भवनाचा दैनंदिन खर्च, देखभाल-दुरुस्ती, मनुष्यबळ, वीज व पाणी देयके यांचा खर्च संबंधित बाजार समितीनेच करावयाचा असून, यासाठी शासनाकडून कोणताही अतिरिक्त निधी देण्यात येणार नाही. या निर्णयामुळे किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांना बाजार समिती परिसरात स्वच्छ, सुरक्षित व सोयीस्कर निवासाची सुविधा उपलब्ध होणार असून, शेतमाल विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी अडचण दूर होणार आहे. आमदार भीमराव केराम यांच्या प्रयत्नांमुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

या प्रकल्पासाठी शासनाकडून एकूण अंदाजित रकमेच्या ७० टक्के म्हणजेच सुमारे १०६.९० लाख रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. हे अनुदान ५० टक्के – ५० टक्के अशा दोन टप्प्यांत वितरित केले जाणार आहे. उर्वरित निधी बाजार समितीने स्वनिधी किंवा कर्जाच्या माध्यमातून उभारणे बंधनकारक राहणार आहे. शासन निर्णयानुसार, सदर बांधकामास सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असून, त्यानंतरच निविदा प्रक्रिया राबवून कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहे. तसेच बांधकाम प्रशासकीय मान्यतेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# हरेगांवफाटा ओव्हरब्रिजवरील वाढत्या अपघातांवर उपाय योजना करण्यासाठी भारतीय लहुजी सेनेचे उपोषण सुरू

**श्रीरामपूर: (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर- नेवासा रोडवरील हरेगांव फाटा येथे असलेल्या ओव्हरब्रिजवर सातत्याने होत असलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर तातडीने उपाययोजना करण्यात यावी या मागणीसाठी भारतीय लहुजी सेनेच्या वतीने सोमवारी दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून उपोषणास सुरुवात करण्यात आली आहे. यापूर्वी या गंभीर प्रश्नाबाबत भारतीय लहुजी सेनेने प्रशासनाला निवेदन देऊन संबंधित बाभी वेळ दिला होता. मात्र प्रशासनाकडून कुठलीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. नेवासा रोडवरील हरेगांव फाटा येथील ओव्हरब्रिज हा अपघातप्रवण ठिकाण असून याठिकाणी वारंवार गंभीर अपघात घडत आहेत. त्यामुळे या ठिकाणी तातडीने संरक्षक कठडे, सूचना



फलक, रस्त्याची दुरुस्ती तसेच वाहतूक नियंत्रण व्यवस्था लागू करावी, अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली आहे. या उपोषणामध्ये भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय सचिव हनीफभाई पठाण, राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब बागुल, राजेंद्र त्रिभुवन, अल्ताफ शेख, रमीज पोपटिया, नंदकुमार बागडे, सिकंदर तांबोळी, रमजान शेख, हाजी गफ्फारभाई पोपटिया, सलीम मेमन, मच्छिंद्र साळुंखे, संदीप शेडगे, राजु कडू, तात्यासाहेब सोनवणे, सतीश लोखंडे, मेहमूद पठाण, नागेश साथे, सलमान पठाण, अण्णा कुऱ्हाडे, रोहन परदेशी, सागर चापनेरकर रज्जाक भाई शेख आरपीआयचे सुभाष त्रिभुवन यांच्यासह अनेक पदाधिकारी सहभागी झाले आहेत. या उपोषणास विविध सामाजिक संघटना व नागरिकांनी भेट देऊन जाहीर पाठिंबा दिला आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी आंदोलकांच्या वतीने देण्यात आला आहे.

# बोळेगावच्या रोजगार सेवकाचा महाप्रताप; रोहयो योजनेतून तब्बल तीन कोटी अपहार केल्याचा आरोप

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

■ अनेक लाभार्थ्यांची तक्रारी, तरीही गटविकास अधिकाऱ्याचे दुर्लक्ष

बिलोली तालुक्यातील मौ. बोळेगाव ग्रामपंचायत अंतर्गत रोहयोच्या मध्येमातून करण्यात येत असलेल्या सार्वजनिक, वृक्ष लागवडीसह विविध कामात येथील ग्रामरोजगार साह्यक विठ्ठल एकंबे हा मस्टरमध्ये आपल्याचं कुटूंबातील व्यक्तीची नावे टाकून अनेक लाभार्थ्यांचे परस्पर लाखो रुपये हडप केल्याच्या ग्रापंकडे तक्रारी दाखल झाल्या आहेत. अशा अनेक कामात तब्बल ३ कोटी रुपयांचे अपहार केल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या सेवकास निलंबीत करण्यासाठी लेखी आदेश दिले, परंतु गटविकास अधिकारी यांच्या नाकर्तेपणामुळे या वादाग्रस्त ग्रामरोजगार साह्यकावर अद्यापही कारवाई करण्यात आली नाही. येथील अकार्यक्षम ग्रामरोजगार साह्यक विठ्ठल एकंबे हा गेल्या काही वर्षांपासून रोहयोच्या माध्यमातून बोळेगाव ग्रामपंचायत मार्फत राबविण्यात येत असलेल्या सार्वजनिक वृक्ष लागवड, सिंचन विहीर, पांदन रस्ते, शेततळे, घरकुलसह अनेक कामे प्रत्यक्षात न करता परस्पर आपल्याच कुटूंबातील व्यक्तीच्या नावे हजेरी मस्टरमध्ये भरून लाखो रुपये हडप केल्याचा बोळेगावच्या ग्रामस्थाकडून आरोप केला जात आहे. दि. १९ व १४ सप्टेंबर रोजी चार घरकुल लाभार्थ्यांनी केलेल्या तक्रारीत लाभार्थ्यांच्या परस्पर १ लाख १० हजार रुपये तर २२,२००, २५,२४५, २५,२४५ असे एकूण १ लाख ८२ हजार ४९० रुपये लाभार्थ्यांना न कळूदेता हडप केले.याबाबत बोळेगावच्या ग्रामपंचायतकडे दि. १४ सप्टेंबर रोजी लाभार्थ्यांकडून तक्रार दाखल करण्यात आली. अशा अनेक तक्रारीमुळे दि.२६ ऑगस्ट २०२५ रोजी घेण्यात आलेल्या ग्रामसभेत रोजगार सेवकास कामावरून निलंबीत करण्याचा ठराव पारित करण्यात आला होता. परंतु कुठे काय माशी शिंकली की...? रोजगार जैसे थे कामावर रुजू आहे. याबरोबर ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक वृक्ष लागवडीचे काम न करता जवळपास ३० लाख रुपये आणि आतापर्यंत रोह्योच्या विविध कामात आपले हित साधून तब्बल ३ कोटी रुपयाचा गैरव्याहार करून शासनाला चुन्ना लावला.

# अनेकांचा दाटून आला कंठ

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या कार्यकर्तृत्वाचा पूर्ण राज्यावर ठसा उमटला. त्यांच्या निधनाच्या धक्क्यातून अजूनही राज्य सावरलेला नाही. सत्तेत राहिलेले व सत्तेच्या बाहेर गेलेले अजितदादा मी जवळून पहिले आहेत. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला कामाचा ठसा उमटवत उत्कृष्ट काम केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही त्यांच्या कामाचा प्रभाव होता. प्रत्येकाला त्यांनी सहकार्यच केले. स्व.अजितदादांनी मांडलेल्या चांदा ते बांधा या संकल्पनेतून त्यांची पूर्ण राज्यात वेगळी ओळख निर्माण झाली. नगर जिल्ह्यावरही त्यांची विशेष मेहेर नजर होती. अशा कर्तृत्व संपन्न, निःस्वार्थपणे मैत्री जपणारा, सुख दुखांच्या प्रसंगांना सर्वांना बरोबर घेणारा नेता आज आपल्यातून गेला आहे, असल्याची भावना पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त करत दादांना श्रद्धांजली वाहिली.

# येवती येथे बँक शाखा मंजूरीच्या हालचालींना वेग

## शाखा मंजूरीसाठी संबंधित अधिकाऱ्यांनी केली येवती मार्केटची प्राथमिक पाहणी !

**मुखेड ता : (समर्थ गांवकरी)**

श्री सद्गुरू नराशाम महाराज तिर्थक्षेत्र येवती येथे मोठी बाजारपेठ असून येथे दर मंगळवारी आठवडी बाजार भरतो. येथील बाजारांचा दहा ते बारा गावातील लोकांचा दैनंदिन तेलामिठांचा व्यवहार आहे. म्हणून येथे राष्ट्रीयकृत बँकेची शाखा व्हावी अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली होती.

यासंदर्भात स्थानिक आमदार डॉ तुषार राठोड व नांदेड लोकसभा खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी वेळोवेळी वरच्या पातळीवर पाठपुरावा केला होता. त्यांचाच एक भाग म्हणून दि. २ फेब्रुवारी रोजी संबंधित राष्ट्रीयकृत बँकेच्या अधिकाऱ्यांनी येवती येथे येऊन येवती येथील बाजार पेठेची पाणी करून स्थानिक लोक प्रतिनिधी,



व्यापारी व गावातील नागरिकांची सविस्तर अशी चर्चा केली असून येथे लवकरच बँकेची शाखा येईल अशा आशेने अनेकांनी या संदर्भात आनंदी भावना व्यक्त केल्या आहेत.

येथे जानेवारी महिन्यात श्री सद्गुरू नराशाम महाराज संजीवन समाधी मोठी यात्रा भरते. यात्रेनिमित्त हजारो भाविक भक्त दर्शनासाठी येवती येथे येतात. यापुर्वी येथे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा होती पण नंतर ते शाखा बंद करण्यात आली होती. तेव्हा पासून आजपर्यंत येथे बँकेची कुठलीही शाखा नसल्याने येथील व्यापारी व गावातील नागरिकांची राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेची मागणी वेळोवेळी आमदार व खासदार साहेब यांच्याकडे केली होती. यापूर्वी नांदेड लोकसभा खासदार रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय वित्त मंत्री श्रीमती निर्मला सितारमन यांच्याकडे नायगाव तालुक्यातील कुष्णूर व मुखेड तालुक्यातील येवती येथे राष्ट्रीयकृत बँकेची निवेदनाद्वारे मागणी केली होती. आता मात्र या संदर्भात प्रत्येक्षात हलचाली चालू झाल्याचे दिसून येत आहे. बँकेची शाखा व्हावी अशी सर्वांचीच इच्छा आहे.

# अजितपवार यांच्या अस्थिकलशाचे नांदेड जिल्ह्यात भावनिक आगमन

## नायगावमध्ये उसळला श्रद्धांजलीचा जनसागर

**नायगाव (वा) (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे दिवंगत लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे आज दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड जिल्ह्यात भावपूर्ण वातावरणात आगमन झाले. या अस्थिकलश यात्रेमुळे संपूर्ण जिल्ह्यात शोकमय आणि श्रद्धेचे वातावरण निर्माण झाले होते.

कहाळा–कुष्णूर–घुंगराळा–नायगाव–नरसी–देगलूर–मुखेड मार्गे कंधार, लोहा व विष्णुपुरी असा प्रवास करत अस्थिकलश यात्रा पुढे नेण्यात आली. ही यात्रा नायगाव शहरात दाखल होताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित पदाधिकारी,



कार्यकर्ते व नागरिकांनी अस्थिकलशाचे दर्शन घेऊन मनःपूर्वक श्रद्धांजली अर्पण केली.

ही अस्थिकलश यात्रा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साईसुभाष, वसंतनगर, नांदेड येथील संपर्क कार्यालयातून सुरू झाली असून, रात्री ९ वाजता काळेश्वर मंदिर परिसरातील गोदावरी नदीत विधीवत विसर्जन करण्यात येणार आहे.

या अस्थिकलश यात्रेत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, अविनाशराव घाटे, सुभाषराव साबणे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश व जिल्हास्तरीय पदाधिकारी, युवक काँग्रेसचे पदाधिकारी, विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्वपक्षीय कार्यकर्ते व असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवंगत अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देत, "नेतृत्व, धैर्य आणि जनतेशी असलेली नाळ कधीच विसरली जाणार नाही," अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. नांदेड जिल्ह्याने अजितदादांना अश्रूंनी आणि श्रद्धेने अखेरचा निरोप दिला.

# २९ लाख ७२ हजार मतदार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ करिता जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र असून याअंतर्गत पुरुष १५ लाख २२ हजार २५६, स्त्री १४ लाख ५० हजार १४ आणि इतर ९१ असे एकूण २९ लाख ७२ हजार ३५९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे, येत्या ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाकरिता जिल्ह्यातील अधिकाधिक मतदारांनी मतदान केंद्रावर जावून मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. बारामती तालुक्यात २ लाख ६४ हजार ६४२, मावळ २ लाख ३१६, मुळशी १ लाख ७३ हजार ४०१, शिरुर ३ लाख १ हजार ७८६, हवेली २ लाख ५१ हजार ५३३, दौंड २ लाख ७३ हजार १००, इंदापूर ३ लाख २१ हजार २, पुरंदर १ लाख ८९ हजार ४०३, भोर १ लाख ५४ हजार ८७०, वेल्हे ५५ हजार २३०, आंबेगाव १ लाख ८४ हजार ५२, जुन्नर ३ लाख ७ हजार २६० आणि खेड तालुक्यात २ लाख ९५ हजार ८२४ असे एकूण २९ लाख ७२ हजार ३५९ मतदार आहेत.

# भाविकांची अडवणूक करणाऱ्या एजंटांवर कारवाई

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

■ उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी जारी केले आदेश

साईबाबा समाधी मंदिर परिसरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची पिळवणूक थांबवण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. भाविकांची वाहने अडवून त्यांना विशिष्ट दुकानातूनच पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या व खासगी पार्किंगचा आग्रह धरणाऱ्या एजंटांवर आता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १५२ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतचे सशर्त आदेश शिर्डी विभागाचे उपविभागीय दंडाधिकारी माणिक आहेर यांनी निर्गमित केले आहेत. शिर्डीत दररोज देश-विदेशातून लाखो साईभक्त दर्शनासाठी येतात. मात्र, मंदिर परिसर व शिर्डी शहरात अनेक ठिकाणी खासगी व्यक्तींकडून सार्वजनिक रस्त्यावर भाविकांची वाहने बेकायदेशीरपणे अडवली जातात. भाविकांना खासगी पार्किंगच्या ठिकाणी वाहने घेण्याचा आग्रह धरला जातो. तसेच विशिष्ट दुकानांतून अव्वाच्या सव्वा दरात पूजासाहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जाते. यातून भाविकांची मोठी आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. अनेकदा भाविकांना दमदाटी, शिवीगाळ व धक्काबुक्की करण्याचे प्रकारही घडले आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने हे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शिर्डी गावाच्या बाहेरील किंवा गावातील सार्वजनिक रस्ते, चौक, बसथांबे व प्रवेश मार्गावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाहने थांबवून त्यांची दिशाभूल करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच कोणत्याही गावातून शिर्डी येथे येणाऱ्या प्रवाशांच्या वाहनांनी विशिष्ट दुकान अथवा आस्थापनेतूनच खरेदी करावी किंवा निवास करावा, असा आग्रह आता धरता येणार नाही. कोणत्याही व्यक्तीने स्वतःला देवस्थान ट्रस्ट किंवा प्रशासनाचा अधिकृत प्रतिनिधी असल्याचे भासवू नये, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. भोजन, निवास किंवा दर्शनाच्या नावाखाली मध्यस्थीचे व्यवहार करणाऱ्यांवरही निर्बंध लादण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम २२३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या आदेशाने प्रभावित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आपली बाजू मांडता येईल, असे प्रशासनाकडून कळवण्यात आले आहे.

# प्रा. रामचंद्र भरांडे यांना पिएच डी अवार्ड प्रधान

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

मौजे अंजनी येथील सुपुत्र माजी सरपंच तथा गोरगरीब जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कार्यरत असलेल्या लोकस्वराज्य आंदोलन या लढाऊ संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र गंगाराम भरांडे यांना नूकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मानव्यविधाशाखेतील अंतर्गत येणार्या लोकप्रशासन विभागाकडून विद्यावाचस्पती पिएच डी प्रदान करण्यात आली आहे. प्रा. रामचंद्र भरांडे यांनी "महाराष्ट्रातील सार्वजनिक धोरण :-विशेष घटक योजना व कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेचा अभ्यास" हे संशोधन लोकप्रशासन विषयचे सुप्रसिद्ध विचारवंत, अभ्यासक "प्रा. डॉ. एम सी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचे




संशोधन पूर्ण केले आहे. बुधवार 28 जानेवारी रोजी दु. 12:30 ते 1 : 30 या वेळेत मुलाखतीचे (व्हायवा )आयोजन करण्यात आले होते. लोकप्रशासन विभागाचे प्रमुख डॉ. शाम शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली व बहिस्थ परिक्षक डॉ. जितेंद्र वासनिक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरची मुलाखत संपन्न झाली. यावेळी अभ्यासक, संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते.

# सामाजिक बांधिलकी जोपासत नगरसेवक संजय घोगरे यांचे रक्तदान शिबिर स्तुत्य उपक्रम : भाजपा नेते एकनाथ पवार

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नगरसेवक संजय घोगरे पाटील यांच्या वतीने सलग गेल्या १९ वर्षा पासून रक्तदान शिबिराचे आयोजन करून अनेक रूग्णांना व अपघातील गरजु रुग्णांना रक्तदान शिबीराच्या माध्यमातून अनेकांना मदत करणे हा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन भाजपा नेते एकनाथ पवार यांनी आयोजित रक्तदान शिबीर प्रसंगी केले.

दरवर्षी प्रमाणे याही १९ व्या वर्षी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले, यावेळी भाजपाचे नेते एकनाथ पवार बालाजी पाटील पुणेगावकर, यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज



यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले ,नंतर माता स्वरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करण्यात आले या शिबिरास खासदार अजित गोपछडे, महानगर अध्यक्ष अमरभाऊ राजूरकर शिबिर प्रसंगी उपस्थिती लावली होती. नगरसेवक संजय घोगरे हे सदैव जनतेसाठी उप्पलब्ध असल्याने आता या प्रभागाला सर्व नगरसेवक चांगले असून भविष्यात असे मोठे रक्तदान शिबिर या सह आरोग्य शिबिराचे आयोजन संजय पाटिल घोगरे करतील असे पक्ष निरीक्षक एकनाथ पवार यांनी सांगितले.

भाजपा नेते बालाजी पुणेगावकर यांनी नुक्त्याच झालेल्या नावामनपा निवडणुकीत भाजपा हा सर्वात मोठा पक्ष विजयी झाला असून लवकरच संजय पाटील घोगरे याना मोठी जबाबदारी भेटेल असे सांगून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी प्रभाग क्रमांक २० मधील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला .

यावेळी डॉ.विजयानंद भोंग,माधव देवसरकर ,वाघाळा भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन रावका,जनार्धन गुपिले ,मनपा माजी विरोधी पक्षनेते जीवन पाटील घोगरे ,माजी नगरसेविका ललिता शिंदे बोकारे करूणा जमदाडे नगरसेविका प्रतिनिधी राजू लांडगे,जेष्ठ नागरिक अशोक लोंढे पाटील ,सरपंच विलास इंगळे , विजयाताई गोडघासे, धीरज स्वामी गजानन कत्ते यांची उपस्थिति होती. यावेळी रक्त संकलन,श्री गुरुगोविंद सिंघजी रक्तपेढीचे डॉ.प्रभू रक्तसंक्रमन अधिकारी ,समाजसेवा अधीक्षक कुणाल महागडे,प्रयोगशाळा सह्यायक, श्रीनिवास विठलंकर कक्ष सेवक अमोल राठोड,आदिनाथ धुमाळ शिवकुमार कांतू ,तर इंडियन रेडक्रॉस रक्त केंद्राचे वजीराबाद जनसम्पर्क अधिकारी दीपा जोंधळे तंत्रद्य अभिजित चिंचपुरकर विशाखा सावळे ,आकांक्षा रणवीर यांनी रक्तसंकलन केले असून या शिबिरात, रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिरात सिडको, हडको,सह ग्रामीण भागातील बळीरामपुर,धनेगाव, गोपाळचावडी ,किवळा,डेरला,ढाकणी सह परिसरातील अनेक भागातुन युवक, नागरिक,महिला उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान केले. शिबीर यशस्वीतेसाठी संजय घोगरे मित्र मंडळ व पदाधिकारी, कार्यकत्यांनी विशेष परिश्रम घेतले तर या वेळी अनेक गावांतील कार्यकर्ते व पदअधिकारी यांनी नवनिर्वाचित नगरसेवक संजय घोगरे पाटील यांचे सन्मान सत्कार करून अभिनंदन पर शुभेच्छा देत त्याच्या कामाचे कौतुक करण्यात आले.

# शिक्षण जगताला लाजवेल अशा घटनेचे काळे पडसाद

**डांग : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या आहवा येथील प्रतिष्ठित 'डांग स्वराज आश्रमशाळे'मध्ये मानवतेला आणि शिक्षण जगताला लाजवेल अशा एका अत्यंत गंभीर घटनेने संपूर्ण बिशपमध्ये संतापाची लाट उसळली आहे. आदिवासी मुलांच्या उज्ज्वल भविष्याच्या आणि सुरक्षिततेच्या नावाखाली चालवल्या जाणाऱ्या या संस्थेत रक्षकच भक्षक बनल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आणि पीडित मुलीला न्याय मिळावा यासाठी विविध आदिवासी संघटना आणि व्यापारी संघटनांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी आहवा नगर पूर्णपणे बंदची घोषणा केली, ज्याला व्यापक पाठिंबा मिळत आहे. या संवेदनशील घटनेच्या थंडावणाऱ्या तपशीलांनुसार, सुमारे सात ते आठ दिवसांपूर्वी,




आश्रमातील इतर विद्यार्थिनी साफसफाई करण्यात व्यस्त असताना, हा बलात्कार करण्याचा नियोजित कट रचण्यात आला. तिच्या असहाय्यतेचा फायदा घेत त्यांनी तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले आणि हे घृणास्पद कृत्य केले. ज्या संस्थेत पालक आपल्या मुलींना शिक्षणासाठी पाठवतात त्या संस्थेत सत्तेचा आणि प्रभावाचा गैरवापर करून मुलींच्या प्रतिष्ठेशी खेळणाऱ्या शिक्षण जगताविरुद्ध अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या घृणास्पद घटनेच्या निषेधार्थ, अहवा नगरमधील बाजारपेठा सकाळपासूनच स्वयंस्फूर्तपणे बंद असल्याचे दिसून आले. व्यापाऱ्यांनी त्यांच्या दुकानांचे फलक फाडून या अत्याचाराचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. रस्त्यांवर वाहतूक विरळ आहे आणि लोक या गुन्हेगार आरोपी प्रफुल्ल नायक यांच्याविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करत आहेत. आदिवासी समाजाच्या नेत्यांनी मागणी केली आहे की हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा आणि आरोपींना कठोर शिक्षा द्यावी जेणेकरून भविष्यात कोणीही असे कृत्य करण्याचे धाडस करू नये. दुसरीकडे, आहवा पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मुख्य आरोपी प्रफुल्लभाई नायक आणि त्याची मदतनीस स्वयंपाकी सोनलबेन यांच्याविरुद्ध पोक्सो कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन रिमांड मिळाल्यानंतर न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे. या घटनेमुळे संपूर्ण डांग जिल्ह्यात घबराट पसरली आहे आणि लोक आता आश्रमशाळांमधील मुलांच्या सुरक्षिततेबाबत सरकारकडून ठोस पावले उचलण्याची मागणी करत आहेत.

# राष्ट्रीय शिव जन्मोत्सव सोहळा होणार ओडिशा जगन्नाथपुरी येथे साजरा

- ओडिशाचे राज्यपाल, ओडिशा मुख्यमंत्री मांझी, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव राहणार उपस्थित

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रीक्षेत्र जगन्नाथ पुरी,ओडिशा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळ्यास ओडिशा राज्याचे मा.मुख्यमंत्री मा.मोहन चरणजी मांझी हे उपस्थित राहणार आहे. या राष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळ्याचे अधिकृत निमंत्रण मा.मुख्यमंत्री महोदयांना त्यांच्या मुख्यमंत्री निवासस्थान,भुवनेश्वर (ओडिशा) येथे सन्मानपूर्वक देण्यात आले



होते.सदर निमंत्रण मा.मुख्यमंत्री महोदयांनी स्वीकारले असून,या ऐतिहासिक व राष्ट्रीय स्वरूपाच्या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची त्यांनी सहमती दर्शविली आहे. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, आडीशाचे (राज्यपाल) मा.डॉ. श्री. कंभमपती हरिबाबु,

केंद्रीय राज्यमंत्री रामदासजी आठवले, केंद्रीय आयुष्यं राज्यमंत्री प्रतापराव जाधव, ओडिशाचे उपमुख्यमंत्री कनक वर्धन सिंह देव , सुदर्शन न्यूजचे संचालक सुरेशजी चव्हाणके, राष्ट्रीय कुंभमेळा प्रवक्ता महंत भक्ती चरणदास महाराज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा राष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावी प्रसार होईल,तसेच कार्यक्रमाची शोभा व प्रेरणादायी महत्त्व निश्चितच अधिक वाढेल.

# पुणे शहर बंगाली क्रिकेट क्लब आयोजित क्रिकेट स्पर्धा संपन्न

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे शहर बंगाली क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धा नुकतीच टेबेकर मैदान, बिबेवाडी येथे संपन्न झाली. या स्पर्धेच्या समारोपा वेळी आमदार हेमंत रासने ,नगरसेवक विशाल धनवडे, सुब्रतो मजुमदार,पुणे शहर बंगाली क्रिकेट क्लबचे अध्यक्ष नयन शेख, सेक्रेटरी अब्बास शेख,कार्याध्यक्ष राफेल शेख, सदस्य जर्सील शेख, हबिब मंडलिक, संजय पाल आणि बंगाली समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी नगरसेवक विशाल धनवडे म्हणाले, गेल्या कित्येक वर्षांपासून बंगाली बांधव पुणे शहरात आणि महाराष्ट्रात गुण्यागोविंदाने राहत आहे. येथे राहत असताना ते आपले सण, उत्सव हे एकत्र येवून साजरे करत आहेत. इतकेच नव्हे तर यातील क्रिकेट प्रेमींकडून या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात येत आहे. ही



खरच वाखाण्या जोगी आणि अभिमानास्पद गोष्ट आहे. आशा प्रत्येक उपक्रमात पुणेकर म्हणून आम्ही त्यांचा पाठीशी उभे आहोत. नयन शेख म्हणाले, कलकत्ता वरून आलेले सर्व कामगार वर्गे एकत्र येवून ही स्पर्धा भरवतात. कामगारांचे मनोरंजन आणि त्यांचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी ही स्पर्धा भरवली जाते. पुणे शहर बंगाली क्रिकेट क्लब आयोजित या स्पर्धेचे २४ वे वर्ष आहे. या स्पर्धेत एकूण १२ संघ सहभागी झाले आहेत. तर या स्पर्धेत खेळण्यासाठी पुणे शहर, महाराष्ट्रासह कलकत्ता मधून देखील मोठ मोठे खेळाडू आले आहेत. स्थानिक बंगाली समाज, कारागीर, व्यावसायिक यांचे बहुमूल्य सहकार्य या स्पर्धेसाठी केले जाते. या स्पर्धेसाठी जवळपास दोन महिने आधीपासून तयारी केली जाते. या स्पर्धेतील विजेता संघ तळेगाव ह्दि मझारे क्लब यांना एक लाखाचे पारितोषिक व स्मृतीचिन्ह, तर उपविजेता शेख ब्रदर्स ११ स्टार या संघास सत्तार हजाराचे पारितोषिक व स्मृतिचिन्ह देण्यात आले.

# आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांची १९४ वी पुण्यतिथी साजरी

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांची १९४ वी पुण्यतिथी निमित्त आळेफाटा येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना अभिवादन करून कार्याचा गौरव करण्यात आला. आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक समिती आळे, आळेफाटा, वडगाव आनंद यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त आळेफाटा चौकातील शिवाजी महाराज पुतळ्यालगत आकर्षक सजावट करण्यात आली होती. यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्यास व राजे उमाजी नाईक यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# विकसित भारत हे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असले पाहिजे - अविनाश धर्माधिकारी

## नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे 'भारत २०४७ आणि मी' व्याख्यानमालेचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्वच्छ, चारित्र्यवान, प्रामाणिक आणि कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी ही देशाची संपत्ती आहे. आपले काम प्रामाणिकपणे करणारा प्रत्येकजण हा देशभक्त आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला जेव्हा शंभर वर्ष पूर्ण होत आहेत तेव्हा 2047 मध्ये भारत एक विकसित राष्ट्र होईल हे प्रत्येक नागरिकांचे स्वप्न असले पाहिजे, आणि त्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे काम केले पाहिजे असे मत निवृत्त प्रशासकीय अधिकारी आणि चाणक्य मंडल संस्थेचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत 2047 आणि मी' या विषयावरील व्याख्यानमालेत अविनाश धर्माधिकारी बोलत होते.



संस्थेचे वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे, विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवेआदि यावेळी उपस्थित होते.

अविनाश धर्माधिकारी म्हणाले, तुम्ही कोणत्याही क्षेत्रामध्ये काम करत असाल तेंव्हा काम करताना तुमच्यातील भारत मातेचा कार्यकर्ता कायम जिवंत राहिला पाहिजे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ त्या पदावर आहेत म्हणून त्यांचेच केवळ भारत विकसित राष्ट्र असावा हे स्वप्न असले नाही पाहिजे. तर प्रत्येक नागरिकाचे असे स्वप्न असले पाहिजे की माझा भारत हा विकसित राष्ट्र झाला पाहिजे आणि त्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करत राहील.

प्रशासन हे देशसेवेचे माध्यम आहे. त्यातून राष्ट्रसेवा आणि विकासाला गती दिली पाहिजे. अमेरिका हे राष्ट्र केवळ अब्राहम लिंकन यांच्यापासून ते डोनाल्ड ट्रम्प यांच्यापर्यंत अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयामुळे सुपर पॉवर झालेला नाही तर तेथील प्रत्येक नागरिकाच्या प्रयत्नामुळे अमेरिका विकसित राष्ट्र झाले आहे. अशाच प्रकारे भारत विकसित राष्ट्र होण्यासाठी भारताचा प्रत्येक नागरिकांनी प्रामाणिकपणे हातभार लावला पाहिजे. आधुनिक काळातही भारत एक विकसित राष्ट्र होण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सेमी कंडक्टर यांसारख्या क्षेत्रांमध्ये आपण अग्रस्थानी राहिले पाहिजे तरच देश हार्डपॉवर आणि सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये भविष्यात पुढे राहील असा विश्वास अविनाश धर्माधिकारी यांनी यावेळी व्यक्त केला. प्रस्ताविकापर भाषणात अमेय सप्रे म्हणाले, देश प्रथम हे आमच्या संस्थेचे कायम ध्येय ठेवलेले आहे आणि त्यानुसारच आम्ही मार्गक्रमण करीत आहोत. त्यामध्ये प्राधान्याने आम्ही पॉलिसी रिफॉर्म करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. वक्फ बोर्डाच्या संदर्भात केंद्र सरकारने स्थापन केलेल्या संयुक्त समितीला आमच्या संस्थेने सादरीकरण केले होते, त्यातील काही बाबींचा त्या संस्थेने अंतर्गत केला हे आमच्या संस्थेचे यश आहे.

सायली गोडबोले जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर पुष्कराज सप्रे यांनी आभार मानले.

# शिंगाणा–गिरमाळ रस्त्यावर वन विभागाची धडक कारवाई

- खैर लाकडाची बेकायदेशीर वाहतूक उधळली
- बोलेरो पिकअपसह ₹१.४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**डांग : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यात वन मालमत्तेची चोरी करणाऱ्या तस्करांविरोधात उत्तर डांग वन विभागाने कडक भूमिका घेत प्रभावी कारवाई केली आहे. उत्तर डांगचे उपवनसंरक्षक (DCF) मुरलीलाल मीना यांना मिळालेल्या विशिष्ट माहितीच्या आधारे त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई राबविण्यात आली.

सिंगणा रेंजचे आरएफओ एम. के. गायकवाड आणि सुबीर रेंजचे आरएफओ प्रीतेशभाई गमीत यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पथकांनी रात्री कडक पहारा ठेवत शिंगाणा–गिरमाळ रस्त्यावर 'कोम्बिंग पेट्रोलिंग' सुरू केली. रात्री सुमारे १० वाजता शिंगाणाहून



गिरमाळकडे जाणाऱ्या रस्त्यावर गस्तीदरम्यान महिंद्रा बोलेरो पिकअप (क्रमांक GJ-19/V-1023) संशयास्पदरीत्या जाताना आढळली. वन कर्मचाऱ्यांनी वाहन थांबविण्याचा इशारा दिला असता चालकाने पकड टाळण्यासाठी वेग वाढवून पळ काढला. पथकाने धाडसाने वाहनाचा पाठलाग केला. शिंगणा गावाच्या सीमेजवळ वाहनाला वेढा घालण्यात आल्यानंतर आरोपींनी अटक टाळण्यासाठी वाहन रस्त्यावरच सोडून अंधाराचा फायदा घेत जंगलात पळ काढला.

घटनास्थळी तपासणी केली असता वाहनामध्ये एकूण २२ तुकडे (१.६१७ घनमीटर) मौल्यवान खैर लाकूड बेकायदेशीररीत्या वाहतूक होत असल्याचे आढळले.

वन विभागाने वाहनासह लाकूड जप्त केले असून जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत ₹१,४५,०००/- इतकी आहे.

ही यशस्वी कारवाई शिंगाणा रेंज आरएफओ एम. के. गायकवाड व सुबीर रेंज आरएफओ प्रीतेश गमीत यांच्या नेतृत्वाखालील पथकांनी केली. या प्रकरणी राज्य गुन्हा क्रमांक ५ (एस.एन. २०२५/२६) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार अज्ञात आरोपींचा सखोल शोध सुरू आहे.

उत्तर डांग वन विभागाच्या त्वरित आणि धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील लाकूड तस्करांमध्ये मोठी घबराट पसरली असून अवैध जंगलतोड व वाहतुकीवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# रोहयो सामाजिक अंकेक्षण समितीची पडताळणी धाब्यावर

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक अंकेक्षण समितीमध्ये प्रामुख्याने ज्या परिसरात काम सुरू आहे, त्या परिसरातील लाभार्थ्यांची निवड केली जाते. या समितीमध्ये ग्रामसभेतून निवडलेले नागरिक, रोहयो मजूर, स्थानिक गावकरी, आणि महिलांचा समावेश असतो, जे पारदर्शकतेसाठी काम करतात. ही समिती कामाच्या गुणवत्तेची, मजुरीची तपासणी करते.परंतु बिलोली तालुक्यात मात्र रोहयो विभागाच्या मार्जितल्या व्यक्तीची समिती निवड केली जाते. यामुळे झालेल्या कामाची पडताळणी धाब्यावर बसून करण्यात येते. शासनाने महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामीण भागातील रोजगाच्या हाताला काम मिळावे आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी रोहयोची मोहीम राबविली जाते.

# श्री संत सेवा पुरस्कार २०२५ ज्येष्ठ निरुपणकार रवींद्र पाठक यांना जाहीर

- गुरुवारी सज्जनगड येथे पुरस्काराचे वितरण होणार

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

श्री समर्थ सेवा मंडळ ,सज्जनगड यांचे वतीने दिला जाणारा श्री संत सेवा पुरस्कार २०२५ यावर्षी ज्येष्ठ निरूपणकार व व्याख्याते रवींद्र पाठक यांना जाहीर करण्यात आला आहे .या पुरस्काराची घोषणा नुकतीच समर्थ सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. पुरस्कार दासनवमी उत्सव काळामध्ये येत्या गुरुवारी ( दि. ५ ) सकाळी साडे अकरा वाजता मंडळाच्या भक्तनिवास इमारती मध्ये विशेष कार्यक्रमात दिला जाणार आहे. अशी माहिती समर्थ सेवा मंडळाचे कार्यवाह समर्थ भक्त योगेश बुवा रामदासी यांनी दिली. हा पुरस्कार श्री समर्थ सेवा



मंडळाचे अध्यक्ष ह. भ. प. गुरुनाथ महाराज कोटणीस यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. यावेळी कार्याध्यक्ष समर्थ भक्त डॉ. अच्युत गोडबोले, जेष्ठ निरूपणकार व सज्जनगड मासिकाचे संपादक प्रा .डॉ. अजित कुलकर्णी, ज्येष्ठ समर्थ भक्त गणपती बुवा रामदासी, रमेश बुवा शेंबेकर रामदासी, समर्थ भक्त विद्याधर बुवा वैशंपायन, विलासराव ताम्हणकर, रसिकाताई ताम्हणकर यांचे सह विविध क्षेत्रातील मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. गुरुवारी ( दि. ५ ) फेब्रुवारी रोजी सकाळी साडे दहा ते साडे अकरा या वेळेत ज्येष्ठ निरूपणकार रवींद्र पाठक यांचे प्रवचन झाल्यावर हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास सातारा जिल्ह्यातील समर्थ भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहनही श्री समर्थ सेवा मंडळाचे वतीने करण्यात आले आहे.

# ग्रामस्थांच्या शोकसभेत दादांच्या आठवणींनी सर्वच गहिवरले

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार हे सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. दादांच्या निधनाने महाराष्ट्र पोरका झाला, त्यांच्यासारखा दूरदृष्टी असलेला नेता पुन्हा होणे नाही. अशा शब्दात सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दादांच्या आठवणी सांगताना अनेकांचा कंठ दाटून आला. येथील ग्रामपंचायत प्रांगणात स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर झालेल्या शोकसभेत स्व. अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील यांनी शोकसभेत दादाच्या आठवणी सांगत मैत्री कशी असावी



याचे आपल्या शैलीत उदाहरण दिले शिवसेना उपतालुका प्रमुख बबन गव्हाणे तंटामुक्त अध्यक्ष खंडेराव आढळराव पाटील सरपंच संगीता शेवाळे पाटील रामदास आढळराव पाटील उत्तम गव्हाणे ग्रामपंचायत सदस्य समीर ढेरंगे दादाभाऊ निसाळ चेअरमन शंकर शेवाळे पाटील भावजी आढळराव पाटील धनेश शेवाळे पाटील व ग्रामस्थ युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते म्हाडा चे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनी शोकसभेत दादा सोबतच्या आठवणी सांगितल्या.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रातच करिअर निवडावे – डॉ. विश्वासराव आरोटे

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी इतरांच्या दबावाखाली न जाता आपल्या आवडीच्या व क्षमतेच्या क्षेत्रातच करिअरची निवड करावी. शासनाकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा आणि संस्था चालकांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आज ग्रामीण भागातील विद्यार्थी देशाच्या विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत, ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले. संगमनेर तालुक्यातील सावरगाव घुले येथील माध्यमिक विद्यालयात आयोजित विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शन



कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बाबासाहेब कडू, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सचिव घुले, विद्यालयाचे मुख्याध्यापक कोटकर, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. आरोटे म्हणाले की, पूर्वी शहरी भागातील विद्यार्थी शिक्षणात आघाडीवर होते. मात्र आता ग्रामीण भागात शाळांच्या इमारती, शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार स्पर्धात्मक ज्ञानदान सुरू झाल्याने ग्रामीण विद्यार्थीही देशपातळीवर चमकत आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना घडविण्याचे काम करीत आहेत. ग्रामीण भागातील आर्थिक अडचणी असूनही शिक्षणाची पायपीट थांबावी, या उद्देशाने संस्थेचे संस्थापक सचिव राघू जाधव यांनी अकोले व संगमनेर तालुक्यात शिक्षणाची दारे उघडली. मोठ्या शिक्षणसंस्था ज्या भागात पोहोचल्या नाहीत, तिथेही त्यांनी दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य केले असून आदर्श महिला या संस्थेमार्फत अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण व खाऊ वाटप करण्यात आले. तसेच विद्यालयासाठी सतरंजी व घड्याळ भेट देण्यात आले. विद्यालयाच्या निकालाची गुणवत्ता, स्वच्छता, तसेच विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग याबाबत डॉ. आरोटे यांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातही शहरी भागाइतक्या सुविधा उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देणे, हेच खरे शैक्षणिक कार्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी विद्यालयाच्या वतीने शास्त्री फळ व पुष्पगुच्छ देऊन डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे उपाध्यक्ष बाबासाहेब कडू यांनी विद्यालयाच्या गुणवत्तेबाबत मार्गदर्शन करत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मेहनतीमुळेच विद्यालयाने पंचक्रोशीत आपली वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगितले. तसेच भविष्यकाळात थोर समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या माध्यमातून विद्यालयात फरशी बसविण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

# हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा अमानुष छळ

- पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




**अहिल्यानगर:** (समर्थ गांवकरी)

हुंड्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक, मानसिक व लैंगिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या सात जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विवाहानंतर अवघ्या काही दिवसांतच छळाला सुरुवात झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. फिर्यादी महिलेचा विवाह दि. २८ एप्रिल २०२५ रोजी प्रतिक हेमंत बेंद्रे (रा. देशमुख वस्ती, आंबळे, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्याशी अहिल्यानगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात रजिस्टर पद्धतीने झाला होता. त्यानंतर हॉटेल रेडियन्स येथे मोठ्या थाटामाटात विवाह समारंभ पार पडला होता.

विवाहात फिर्यादीच्या वडिलांनी संसारोपयोगी साहित्य, दागिने, मंगळसूत्र, कर्णफुले, पैजन तसेच पतीस रोख एक लाख रुपये व सोन्याची अंगठी दिली होती. विवाहासाठी सुमारे १५ ते २० लाख रुपयांचा खर्च केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

विवाहानंतर सुरुवातीचे चार-पाच दिवस सासरी नीट वागणूक देण्यात आली. मात्र त्यानंतर सासू अनुपमा बेंद्रे व नणंद सुप्रिया चौधरी यांनी माहेरकडून कमी सोने दिल्याचे टोमणे मारण्यास सुरुवात केली.

"मोठ्या सुनेने घरातील सर्व फर्निचर व सामान आणले आहे, तुझ्या वडिलांनी काहीच दिले नाही," असे म्हणून वारंवार १५ तोळे सोने आणण्याची मागणी करण्यात येत होती. तसेच जाव प्रियंका बेंद्रे हिने घरातील सर्व जड व हलकी कामे जबरदस्तीने करून घेत शेतातील कामासाठीही पाठवले. काम न केल्यास उपाशी ठेवणे, आजारी असतानाही उपचार न करणे, असा अमानुष छळ केल्याचा आरोप आहे. तक्रारीत मानलेले मामे सासरे प्रशांत घोरपडे यांच्याकडून लैंगिक छळ झाल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अंघोळीच्या वेळी जबरदस्तीने जवळ बोलावणे, शरीराला स्पर्श करणे, हात पकडणे, अश्लील वर्तन करणे, अशा घटना वारंवार घडल्याचे फिर्यादीने सांगितले.

याबाबत पतीकडे तक्रार केल्यानंतरही त्याने संरक्षण देण्याऐवजी छळात साथ दिल्याचे नमूद आहे. भाऊ पवन बेंद्रे यानेही अश्लील नजर टाकणे, अंगावर हात फिरवणे, विरोध केल्यास मारहाण करणे, असा प्रकार केल्याचा आरोप आहे. पती प्रतिक बेंद्रे याने "घरातील सर्व निर्णय माझ्याच माणसांचे चालतात," असे म्हणत फिर्यादीला धमकावले व माहेरहून पैसे आणण्याचा दबाव टाकला.



पुणे : पुणे महानगरपालिकेच्या उपमहापौरपदी रिपब्लिकन पक्षाचे राज्य कार्यकारिणीचे संघटक सचिव परशुराम वाडेकर यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे तसेच सभागृह नेते गणेश बिडकर यांचे रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी विशेष पत्राद्वारे अभिनंदन व आभार व्यक्त केले आहेत.

## थोडक्यात बातम्या...

### डॉ. दिनेश गुलाब चव्हाण यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची पीएचडी



पुणे (स. गांवकरी) : नाथ जोगी–भराडी समाजाचा पारंपरिक उदरनिर्वाह भिक्षेवर आधारित असताना, डॉ. दिनेश यांनीही हा व्यवसाय स्वतः केला होता . अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना शिक्षणासाठी सातत्याने पाठबळ दिले आणि त्याच बळावर त्यांनी शिक्षणाचा मार्ग ठामपणे निवडला. पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी आश्रम शाळेत पूर्ण केले व उच्च शिक्षण हे समाज कल्याणचे होस्टेल मध्ये राहून पूर्ण केले. नाथ जोगी–भराडी या भटक्या समाज परंपरेने अत्यंत मागासलेला व शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहिलेला आहे. अशा परिस्थितीतून पुढे येत वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून महाराष्ट्रात नाथ जोगी–भराडी या भटक्या समाजातून पीएचडी पदवी प्राप्त करणारे डॉ. दिनेश गुलाब चव्हाण हे पहिले व्यक्ती ठरले आहेत. त्यांनी मुंबई येथील नामवंत सेठ जी.एस. वैद्यकीय महाविद्यालय येथून डॉ. अमिता मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी प्राप्त केली. डॉ. दिनेश गुलाब चव्हाण हे यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी व मागासलेल्या पट्ट्यातील करणवाडी (ता. पांढरकवडा) येथील मूळचे रहिवासी आहेत. सध्या ते ढोले पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे येथे प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. या यशाबद्दल ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री सागर ढोले पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून विशेष पारितोषिक जाहीर केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुणशेकरण आणि डॉ. अक्षय खटावकर यांनीही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. डॉ. दिनेश गुलाब चव्हाण यांचे हे यश भटक्या व वंचित समाजातील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे.

### विकसित भारत हे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असले पाहिजे



पुणे (स. गांवकरी) : स्वच्छ, चारित्र्यवान, प्रामाणिक आणि कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी ही देशाची संपत्ती आहे. आपले काम प्रामाणिकपणे करणारा प्रत्येकजण हा देशभक्त आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला जेव्हा शंभर वर्ष पूर्ण होत आहेत तेव्हा 2047 मध्ये भारत एक विकसित राष्ट्र होईल हे प्रत्येक नागरिकांचे स्वप्न असले पाहिजे, आणि त्यासाठी प्रत्येकाने आपल्या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे काम केले पाहिजे असे मत निवृत्त प्रशासकीय अधिकारी आणि चाणक्य मंडल संस्थेचे संस्थापक अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत 2047 आणि मी' या विषयावरील व्याख्यानमालेत अविनाश धर्माधिकारी बोलत होते. संस्थेचे वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहेंदळे, विश्वस्त अमेय सप्रे, प्रीतम थोरवेआदि यावेळी उपस्थित होते. अविनाश धर्माधिकारी म्हणाले, तुम्ही कोणत्याही क्षेत्रामध्ये काम करत असाल तेंव्हा काम करताना तुमच्यातील भारत मातेचा कार्यकर्ता कायम जिवंत राहिला पाहिजे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ त्या पदावर आहेत म्हणून त्यांचेच केवळ भारत विकसित राष्ट्र असावा हे स्वप्न असले नाही पाहिजे. तर प्रत्येक नागरिकाचे असे स्वप्न असले पाहिजे की माझा भारत हा विकसित राष्ट्र झाला पाहिजे आणि त्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करत राहील. प्रशासन हे देशसेवेचे माध्यम आहे. त्यातून राष्ट्रसेवा आणि विकासाला गती दिली पाहिजे. अमेरिका हे राष्ट्र केवळ अब्राहम लिंकन यांच्यापासून ते डोनाल्ड ट्रम्प यांच्यापर्यंत अध्यक्षांनी घेतलेल्या निर्णयामुळे सुपर पॉवर झालेला नाही तर तेथील प्रत्येक नागरिकाच्या प्रयत्नामुळे अमेरिका विकसित राष्ट्र झाले आहे. अशाच प्रकारे भारत विकसित राष्ट्र होण्यासाठी भारताचा प्रत्येक नागरिकांनी प्रामाणिकपणे हातभार लावला पाहिजे.

# दिव्यातील आर्य गुरुकुल इंग्लिश स्कूलचा "आर्योत्सव" उत्साहात संपन्न

**ठाणे, दिवा :** (समर्थ गांवकरी)

दिवा दातीवली येथील आर्य गुरुकुल इंग्लिश स्कूल यांचा वार्षिक स्नेहसंमेलन 'आर्योत्सव २०२६' हा दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या जल्लोषात पार पडला. विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना व व्यक्तिमत्त्व विकासाला व्यासपीठ देणारा हा कार्यक्रम उपस्थित मान्यवर, पालक व शिक्षकांच्या उपस्थितीत यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी शाळेचे संस्थापक ॲड. तुषार चंदर म्हात्रे, सह संस्थापक प्रोफ. रविता तुषार म्हात्रे, तसेच प्रमुख पाहुणे शिवसेना दिवा शहरप्रमुख / नगरसेवक रमाकांत मढवी, नगरसेविका अर्चना पाटील, नगरसेविका वेदिका पाटील, समाजसेवक साहिल



पाटील , समाजसेवक सोपान म्हात्रे, हनुमान म्हात्रे, विष्णू म्हात्रे, गजानन म्हात्रे, दत्तात्रय म्हात्रे, दीपक पाटील, पवन पाटील, अतुल पाटील, यश म्हात्रे, समिश गोविंदन, अमर म्हात्रे, किरण दळवी, संतोष पडवळ, अमित जाधव, अमित मोरे तसेच मुख्यध्यापिका सौ. प्रियंका ठीकेकर व शिक्षकवर्ग उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

'आर्योत्सव २०२६' हा कार्यक्रम दोन पर्वात संपन्न झाला असून या मध्ये पूर्वप्राथमिक ते माध्यमिक विभागापर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते, लोकनृत्ये, आधुनिक नृत्य, नाटिका, योग प्रात्यक्षिके तसेच सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरले. प्रत्येक सादरीकरणातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शिस्त व सर्जनशीलता स्पष्टपणे दिसून आली. कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक, क्रीडा व विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना पालकांच्या चेहऱ्यावर अभिमान झळकत होता. ॲड. तुषार म्हात्रे यांनी शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पालकांनीही कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल शाळेचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. उमेश राठोड यांनी व शाळेची सह शिक्षिका प्रज्ञा पुरकर, सलोनी दास, ग्रीफीना डिसुझा यांनी प्रभावीपणे केले तर शिक्षक व विद्यार्थ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व संस्मरणीय ठरला. शेवटी आभार प्रदर्शन व राष्ट्रीयगीताने 'आर्योत्सव २०२६'ची सांगता झाली.

# महापौरपदी पिंपळोलकर तर उपमहापौरपदी पाटील यांची निवड



**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

ठाणे महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाची निवडणूक आज पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बिनविरोध झालेल्या या निवडणुकीत ठाणे शहराच्या महापौरपदी शिवसेनेच्या शर्मिला पिंपळोलकर यांची, तर उपमहापौरपदी भारतीय जनता पक्षाचे कृष्णा दादू पाटील यांची निवड झाल्याची अधिकृत घोषणा पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी केली. आज (03 फेब्रुवारी) सकाळी 11.30 वाजता ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेस पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ, जिल्हाधिकारी, ठाणे तसेच महापालिका सचिव मनीष जोशी उपस्थित होते.

# होम मिनिस्टरसह विविध स्पर्धा संपन्न



**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

दिव्यात ॐ साई मित्र मंडळ, गणेश नगर, दिवा (पु).आयोजित श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली होती. यंदाचे हे वर्ष १६ वे वर्षं असून सदर कार्यक्रम मोठ्या थाटमाटात व उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रम उत्साहात पार पडण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष तसेच शिवसेना उपविभाग प्रमुख अनिल रामदास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ओम् साई चाळ, आर. डी. अपार्टमेंट, सुरेश दादा अपार्टमेंट मधील शेकडो महिला मंडळ आणि सर्व पुरुष कार्यकर्त्यांनी खूप मेहनत घेतली. ॐ साई मित्र मंडळ आयोजित महापुजे निमित्ताने होम मिनिस्टरसह अनेक शालेय स्पर्धा संपन्न व सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित केले होते. शालेय मुलांच्या चित्रकला स्पर्धा, विविध ग्रुप खेळ स्पर्धा, महिलांचा होम मिनिस्टर कार्यक्रम तसेच नृत्य स्पर्धा ई. कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. प्रसंगी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना दिवा शहरप्रमुख तथा नगरसेवक रमाकांत मढवी, नगरसेविका साक्षीताई मढवी, नगरसेवक दीपक जाधव तसेच विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, इतर अनेक शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष अनिल नाईक, आधारस्तंभ योगेंद्र नाईक तसेच दिनेश नाईक आणि मंडळातील ज्येष्ठ सभासद यांच्याहस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आले.

# ठाण्यात उद्या ओडिशा येथील राष्ट्रीय अधिवेशन रद्द करण्याच्या षडयंत्राविरोधात देशव्यापी आंदोलन

## ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य रॅली

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

भारत मुक्ती मोर्चा, बहुजन क्रांती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा व राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा (ठाणे जिल्हा) यांच्या संयुक्त विद्यमाने ओडिशा येथील राष्ट्रीय अधिवेशन रद्द करण्याच्या षडयंत्राविरोधात देशव्यापी आंदोलन करण्यात येणार असल्याचे कल्याण येथील पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले. सदर पत्रकार परिषदेत बामसेफचे 42 वे राष्ट्रीय अधिवेशन आणि भारत मुक्ती मोर्चाचे 16 वे राष्ट्रीय अधिवेशन हे ओडिशा राज्यातील कटक येथे 5 दिवसांचे (26 ते 30 डिसेंबर 2025) आयोजित करण्यात आले होते.

मात्र आरएसएस प्रणित भाजपा सरकारने तेथील स्थानिक प्रशासनाला हाताशी धरून, षड्यंत्रपूर्वक या राष्ट्रीय अधिवेशनांची परवानगी रद्द करण्यास भाग पाडले असा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला आहे. सदर अधिवेशनांचे महत्त्व स्पष्ट करताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की हे अधिवेशन ईव्हीएम मशीनमध्ये सातत्याने होणाऱ्या गडबडी व संभाव्य घोटाळ्यांबाबत देशपातळीवर ठोस भूमिका घेण्यासाठी तसेच ओबीसींच्या जातनिहाय जनगणनेबाबत ऐतिहासिक व निर्णायक पावले उचलण्यासाठी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनासाठी

देशभरातील हजारो कार्यकर्ते, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते तसेच परदेशातूनही डेलिगेट्स (प्रतिनिधी) येणार होते. हे विचारमंथन आणि निर्णय प्रक्रिया होऊ नये, म्हणूनच सत्ताधाऱ्यांनी जाणीवपूर्वक या कार्यक्रमाला विरोध करून तो रद्द करण्याचा प्रयत्न केला असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच राष्ट्रीय अधिवेशन रद्द करणे म्हणजे संविधानातील कलम 14 (समानता), कलम 19 (अभिव्यक्ती व संघटन स्वातंत्र्य) आणि कलम 21 (जीवनाचा अधिकार) यांचे थेट उल्लंघन आहे याच अन्यायाच्या विरोधात




संपूर्ण देशभरात विविध ठिकाणी आंदोलने सुरू असून त्याच देशव्यापी चरणबद्ध आंदोलनाचा भाग म्हणून दिनांक 05 फेब्रुवारी 2026, बुधवार रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे 22 फेब्रू 2026 नागपुर येथे होणाऱ्या देशव्यापी महारॅली अंतर्गत जिल्हास्तरीय रॅली भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती देण्यात आली. ही रॅली कोणत्याही समाजाविरोधात नसून संविधान, लोकशाही आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठीची लोकशाहीवादी रॅली असल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. आज जर समाज गप्प बसला तर उद्या संविधान फक्त पुस्तकात उरेल. आजचे मौन म्हणजे उद्याची गुलामगिरी म्हणून ठाणे जिल्ह्यातील सर्व नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी, कामगार, कर्मचारी व संविधानप्रेमी जनतेने 05 फेब्रुवारी 2026 रोजी मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी होऊन या आंदोलनाला पाठिंबा द्यावा असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/११/२०२६ अकोले दि. ०३/०२/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. संगिता अशोक माळवे, रा. नाशिक, ता. नाशिक, जि. नाशिक** यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **यांचा स्वतः संगिता अशोक माळवे यांचा जन्म दि. १४/०५/१९७६ रोजी** मामाच्या घरी **आंबड** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **आंबड**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. संगिता अशोक माळवे, रा. नाशिक**, ता. नाशिक, जि. नाशिक **यांचा स्वतः संगिता अशोक माळवे यांचा जन्म दि. १४/०५/१९७६ रोजी आंबड** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **आंबड**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०३/०२/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

कामगिरी क्लर्क

हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

# विविधतेतून एकतेचा संदेश देणारा NKT शाळेचा भव्य वार्षिक कार्यक्रम उत्साहात संपन्न!

**ठाणे :** (समर्थ गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे तसेच भारतीय संस्कृतीतील "विविधतेतून एकता" हा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने NKT शाळेचा वार्षिक कार्यक्रम मंगळवार, दि. २ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी शाळेच्या सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण व देखण्या वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांची सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि सांस्कृतिक मूल्ये यांचे दर्शन घडवणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमाला गेस्ट ऑफ ऑनर म्हणून डॉ. उषावती शेट्टी, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. निकिता कोठारी (मुख्याध्यापिका, इंडो-स्कॉच



ग्लोबल स्कूल, ठाणे) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच ट्रस्टचे सचिव श्री. नटवरलाल विरजीभाजी ठक्कर, अध्यक्ष डॉ. श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला, आदरणीय प्राचार्या सौ. लिडिया सालियन आणि श्री. जतिन प्रजापती यांची उपस्थिती कार्यक्रमाच्या शोभेत भर घालणारी ठरली. मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे व उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने करण्यात आली. त्यानंतर ज्ञान, बुद्धी व समृद्धीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.



यंदाच्या वार्षिक कार्यक्रमाची थीम "Masterpiece of Magnificent" अशी होती. या थीमनुसार विद्यार्थ्यांनी सादर केलेली नृत्ये, नाट्यप्रयोग व सांस्कृतिक सादरीकरणे ही संध्याकाळची विशेष आकर्षणे ठरली. विविध प्रांतांची संस्कृती, एकात्मतेचा संदेश, सामाजिक मूल्ये आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ या सादरीकरणांतून प्रभावीपणे मांडण्यात आला. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शिस्तबद्ध सादरीकरण आणि संघभावना प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली. प्रत्येक कार्यक्रमानंतर प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट झाला.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे मनापासून कौतुक करत शिक्षकवर्गाच्या मार्गदर्शनाचेही विशेष अभिनंदन केले. विद्यार्थ्यांमधील कला, नेतृत्वगुण आणि सर्जनशीलतेचे हे दर्शन शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक गुणवत्तेची साक्ष देणारे ठरले. कार्यक्रमाचा समारोप हार्दिक धन्यवादप्रदर्शनाने करण्यात आला. यावेळी अतिथी, ट्रस्ट व्यवस्थापन, शिक्षकवर्ग, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या वार्षिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी "विविधतेतून एकता" हा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचवला. NKT शाळेचा हा वार्षिक कार्यक्रम सर्व उपस्थितांसाठी आनंद, प्रेरणा व अभिमानाच्या आठवणी देणारा ठरला असून तो दीर्घकाळ स्मरणात राहील, यात शंका नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# जामखेड शहरातील मलनिस्सारण प्रकल्प (टप्पा-१) चे काम निकृष्ट

## राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष रस्त्यावर उतरणार. तहसीलदार यांना दिले निवेदन

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**



जामखेड नगरपरिषद हद्दीतील मलनिस्सारण प्रकल्प (टप्पा-१) अंतर्गत सुरू असलेले काम अत्यंत निकृष्ट, नियमबाह्या व संथ गतीने सुरू आहे. याबाबत तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणी नुकतीच राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांना निवेदन देण्यात आले आहे.

जामखेड शहरात सध्या नगरपरिषद हद्दीतील मलनिस्सारण प्रकल्प (टप्पा-१) अंतर्गत सुरू असलेली गटार व संबंधित सिव्हिल कामे ही अत्यंत निकृष्ट दर्जाची, शासनमान्य अंदाजपत्रक व तांत्रिक निकषांचे सर्रास उल्लंघन करणारी व अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. सदर कामांमुळे जामखेड शहरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. सदर प्रकल्पासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर असताना प्रत्यक्षात मात्र दर्जाहीन व नियमबाह्य पद्धतीने कामे सुरू असल्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचा संशय निर्माण होत आहे.

या संदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून मंगळवार दि 3 फेब्रुवारी रोजी सकाळी तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांना निवेदन दिले. आपल्या मागण्यान बाबत म्हंटले आहे की गटार चेंबर व चेंबरची साईज सिमेंट कॉंक्रीट करताना मंजूर अंदाज पत्रकातील मापदंड व तांत्रकनिकष पाळले जात नाहीत.

तसेच कमी दर्जाचे साहित्य वापरून चेंबर बांधले जात आहेत. गटारसाठी पाईप टाकताना जूने सिमेंट रस्ते जेसीबी मशीनने बेदरकारपणे फोडले जात आहेत, यामुळे रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शासनाच्या मालमत्तेची जाणीवपूर्वक नासधूस करण्यात येत आहे. शहरातील अनेक ठिकाणी पाईप टाकल्यानंतर खोदलेली ठिकाणे दीर्घकाळ बुजविली जात नाहीत, कामे अर्धवट सोडून दिल्यामुळे नागरिकांना अपघात, वाहतूक कोंडी, धूळ-चिखल व आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

गटार लाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची दुरूस्ती मंजूर अंदाजपत्रका नुसार व गुणवत्ता पूर्ण पद्धतीने करण्यात येत नाही, ज्यामुळे रस्ते अधिकच खराब झाले आहेत.

एका चेंबरपासून दुसऱ्याच्या चेंबरपर्यत टाकण्यात येणारे पाइप हे आवश्यक दर्जाचे, व जाडीचे नसत्याचे प्रत्यक्ष पाहणीमध्ये आढळून येत आहे. सदर कामे अत्यंत संथ गतीने सुरू असून, हीच परिस्थिती कायम राहिल्यास ठरवून दिलेल्या कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होणार नाही, हे स्पष्ट आहे. यांचा थेट त्रास जामखेड शहरातील हजारो नागरिकांना सहन करावा लागत आहे. याबाबत वेळोवेळी तोंडी व लेखी तक्रारी करूनाही संबंधित ठेकेदार, अभियंते व जबाबदार अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

सदर कामांची तात्काळ तांत्रिक व आर्थिक चौकशी करावी, ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांबर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही करावी, निकृष्ट काम तात्काळ थाबवून नवीन मोजमाप व दर्जेदार पद्धतीने काम सुरू करण्याचे आदेश देण्यात यावेत, शहरातील खोदलेले रस्ते तात्काळ दरुस्त करून नागरिकांना दिलासा द्यावा अन्यथा, प्रशासनाकडून ७ दिवसांच्या आत ठोस व समाधान कारक कार्यवाही न झाल्यास, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गट व जामखेड शहरातील समस्त नागरिकांच्या वतीने जामखेड तहसील कार्यालय समोर बेमुदत उपोषण व तीव्र लोकशाही आंदोलन सरू करण्यात येईल असे देखील तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहाजी (काका) राळेभात, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा सरचिटणीस राजेंद्र पवार, वसीम सय्यद, राजु गोरे, कुंडल राळेभात, माजिद कुरैशी, हरीभाऊ आजबे, अवधुत पवार, इस्माईल सय्यद, निखील घायतडक, अमोल गिरमे, सागर सदाफुले, प्रशांत राळेभात, प्रविण उगले, संदीप गायकवाड, अशोक घुमरे, अनिल अडाले, सचिन शिंदे, डॉ. प्रणव राळेभात, प्रविण माकुडे, सागर भोसले, बिलाल शेख, अमर चाऊस, दत्ता डिसले, इम्रान तांबोळी, नासीर सय्यद सह अनेक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येंने उपस्थित होते.

### अतिक्रमण हटल्याशिवाय विकास नाही!

जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम देखील रखडले आहे. गटार, पाणीपुरवठा, रस्ते सगळी विकासकामे अतिक्रमणामुळे रखडली आहेत. काहींच्या बेकायदेशीर अडथळ्यामुळे संपूर्ण जामखेडकरांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याप्रश्नी तात्काळ कारवाई करून शहराच्या विकासासाठी रस्ते त्वरित मोकळे करावेत, अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतर्फे तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल.

**- शहाजी (काका) राळेभात, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते**

# नगर शहरात युवतीची छेडछाड करून जबरदस्तीने ओढण्याचा प्रयत्न; तिघांविरोधात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



बोल्हेगाव उपनगरात राहणाऱ्या युवतीची छेडछाड करत तिला जबरदस्तीने घराबाहेर ओढण्याचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी (१ फेब्रुवारी) सायंकाळी घडली आहे.

या घटनेदरम्यान युवतीच्या आई-वडील व भावालाही मारहाण करण्यात आली. याप्रकरणी तिघांविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पीडित २१ वर्षीय युवतीने फिर्याद दिली आहे. ऋषीकेश नागथाई, प्रसाद भंडारी (पूर्ण नावे माहिती नाही, दोघे रा. बोल्हेगाव) व अमोल कचरे (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. पीडिताने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ऋषीकेश नागथाई हा नेहमी अश्लिल नजरेने पाहणे, हातवारे करणे, शिट्ट्या वाजवणे तसेच डोळा मारणे असे प्रकार करत होता.

याबाबत त्याला व त्याच्या कुटुंबीयांना वारंवार समजावून सांगण्यात आले होते. मात्र, त्याच्या वर्तनात कोणताही बदल झाला नाही.रविवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ऋषीकेश व त्याचे मित्र प्रसाद भंडारी आणि अमोल कचरे हे तिघे जण फिर्यादीच्या घराजवळ आले. त्या वेळी घरात एकटी बसलेल्या फिर्यादीला उद्देशून त्यांनी मोठमोठ्याने आरडाओरडा करत अश्लिल व अपमानास्पद शब्द वापरले. फिर्यादी कपडे काढण्यासाठी जिन्याने वर जात असताना तिघांनी घराच्या कंपाउंड गेटमध्ये प्रवेश करून ऋषीकेश नागथाई व प्रसाद भंडारी यांनी तिचा हात जबरदस्तीने धरत तिला गेटबाहेर ओढण्याचा प्रयत्न केला.

फिर्यादीने आरडाओरडा केल्यावर तिचा भाऊ, आई व वडील हे तातडीने बाहेर आले. त्यांनी फिर्यादीचा हात सोडवून जाब विचारताच तिघा संशयित आरोपींनी तिच्या आई-वडील व भावाला मारहाण केली.

या घटनेदरम्यान परिसरात नागरिकांची गर्दी जमू लागल्याने आरोपींनी शिवीगाळ करत, पोलिसांत तक्रार केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

# ७ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नमुद मिळकतीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देण्याचा आदेश तहसिलदार यांच्याकडुन मिळवुन देण्यासाठी तक्रारदाराकडे ७,००० रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारताना कोपरगाव तहसील कार्यालयातील महसूल सहायक वर्ग ३ श्रीमती अंजना पंडीत पवार ( वय- ३६ वर्षे ) यांना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.सदर कारवाई २ जानेवारी रोजी कोपरगाव तहसील कार्यालयात करण्यात आली.

मिळकतीचा वाटप तक्ता मंजुर करून ताबा देण्याचा आदेश तहसिलदार यांच्याकडुन मिळवुन देण्यासाठी महसूल सहायक श्रीमती अंजना पवार यांनी तक्रारदाराकडे ७,००० रूपये लाचेची मागणी केली होती.

# नाम हे सत्कर्माचा पाया व कळस - लक्ष्मण महाराज नांगरे

- शिलाविहारला गोंदवलेकर महाराजांच्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



मुखाने नाम म्हणणाऱ्याचे लक्ष भगवंताकडे असो वा नसो तरी ते नाम घेत राहिल्याचे सत्कृत्य पदरात पडते, इतर कर्मे आणि नाम घेण्याचे कर्म यामध्ये हाच मोठा फरक आहे. इतर कर्मांना पूर्णत्व किंवा सत्यत्व नामाने येते. नाम आणि अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाही. त्यामुळे नाम भगवंताच्या स्मरणात घेतले किंवा नाही हा प्रश्न उद्भवत नाही.

नाम मुखी आले की सत्कर्म होऊच लागतात.नाम हेच सत्कर्माचा पाया आहे तसाच कळस ही आहे.असे निरूपण कीर्तनकार हभप लक्ष्मण महाराज नांगरे यांनी केले.

सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे किर्तन होऊन दहीहंडी फोडून करण्यात आली.

याप्रसंगी नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका रोशनी ताई त्र्यंबके, आकाश त्र्यंबके, माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार,माऊली गायकवाड, बिभीषण अनभुले, सुंदरदास रिंगणे,प्रसाद रिंगणे, सेवाभावी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

ह.भ.प.नांगरे महाराजांनी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे जीवन संपूर्ण राम नामात कसे गेले, त्यांचे चरित्र ग्रंथातील महत्व विशद करून नामाचे महत्त्व सांगितले. नाम घेणाऱ्याला सत्कर्म टाळू म्हटले तरी टाळता येणार नाहीत. सत्कर्म फळाला आली असे केव्हा म्हणता येईल तर भगवंताचे नाम मुखी येईल तेव्हाच ते फळाला आली असे समजा.तेव्हा नामाचा ध्यास धरा,नामाशिवाय जगणे खरे नाही असे वाटले की नामावरती निष्ठा वाढते.तेव्हा रामनामाचे स्मरण करा.असे आवाहन त्यांनी केले.

या अखंड हरिनाम सप्ताहात श्रीमद देवी भागवत कथा डॉ.अनिकेत घोटणकर यांनी सांगितली. यावेळी कुमारिका पूजन, कुंकुमार्चन असे कार्यक्रम पार पडले. कथा ऐकण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. देवी भागवत कथेच्या समारोपप्रसंगी दीप प्रज्वलानाने महाआरती करण्यात आली.

या सप्ताहामध्ये पहाटे रुद्राभिषेक ग्रंथ वाचन भजन आरती महाप्रसाद हरिपाठ पंचपदी भजन असे धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले यासाठी हभप गंगाधर झाडे, महाराज हभप कृष्णा रायकर महाराज, पंडित महाराज, दिलीप पुंड, सखाराम पंडित यांचे सहकार्य लाभले. श्री ब्रह्मचैतन्य गोंधळेकर महाराज यांचा जन्मोत्सव झाल्यावर काल्याचे किर्तन आणि दहीहंडी फोडून सप्ताहाची सांगता झाली.

# गव्हाचे पोते लुटणारे ४ आरोपी ३५,४०,०००/- रुपये किमतीचे मुद्देमालासह जेरबंद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



याबाबतची माहिती अशी की, फिर्यादी श्री जगदिश चतृभुज माळी (वय- ५५ वर्षे, रा. लहुजा, ता. सितामऊ, जि. मंदसौर, मध्यप्रदेश) हे त्यांचेकडील टाटा कंपनीची गाडी क्रमांक आर. जे. 09 जी. ई. 5957 हिमध्ये मध्यप्रदेश राज्यातुन गहु भरुन सोलापुर या ठिकाणी घेवुन जाण्यासाठी निघाले असतांना दि. २७ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८.३०वा. चे सुमारास देहरे टोलनाक्याजवळ ४ तोंड बांधलेल्या इसमांनी फिर्यादीचे ताब्यातील गाडीमध्ये घुसुन फिर्यादी व क्लिनर यांना चाकुने जिवे ठार मारण्याची धमकी देवुन त्यांचे हात पाय बांधुन गाडीचे केबिनमध्ये झोपवले व गाडीमधील ९,६७,२००/- रुपये किमतीचे गव्हाचे ९५३ कट्टे आरोपींचे ताब्यातील गाडीमध्ये भरुन घेवुन गेले तसेच फिर्यादी व क्लिनर यांना निवडुंगे, ता. पाथर्डी शिवारामध्ये गाडीसह सोडुन दिले आहे.

सदर घटनेबाबत एम.आय. डी.सी. पोलीस ठाणे गु.र.नं. 67/2026 भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४), ३(५) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हा घडल्यानंतर मा. श्री सोमनाथ घार्गे सो, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांना गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले आहे. सदर आदेशानुसार पो. नि. श्री किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वाखाली ३ पथके तयार करण्यात आली होती.

सदर पथकामध्ये पोउपनि/ अनंत सालगुडे, संदीप मुरकुटे, महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार शाहिद शेख, गणेश धोत्रे, विष्णु भागवत, विजय पवार, दिपक घाटकर, फुरकान शेख, राहुल डोके, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डीले, विशाल तनपुरे, रमिझराजा आतार, प्रशांत राठोड, अरुण मोरे, भगवान धुळे, उत्तरेश्वर मोराळे यांचा समावेश करण्यात आला होता. वरील पथकांनी तात्काळ घटनाठिकाणी भेट देवुन आरोपीचे गुन्हा करण्याची पध्दत तसेच व्यवसायीक कौशल्याचे आधारे आरोपींची माहिती काढत असतांना पथकास सदरचा गुन्हा हा अर्जुनसिंग सरदार (रा. कोलारस, जि. शिवपुरी) व त्याचे साथीदारांनी सदरचा गुन्हा केल्याची माहिती प्राप्त झाली.

सदर माहितीचे आधारे आरोपींचा मध्यप्रदेश राज्यामध्ये शोध घेत असतांना सदरचे आरोपी हे शिवपुरी मध्यप्रदेश येथुन पुणे या ठिकाणी जाणारे असल्याची माहिती मिळाल्याने पथकाने आरोपींच्या ट्रकचा पाठलाग करुन सदरची ट्रक (नंबर आर. जे. ११ जी. सी. २७०४) ही अरणगांव परिसरामध्ये ताब्यात घेतली. सदर ट्रकमध्ये २ इसम मिळुन आले. सदर इसमांना त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांची नावे १) अर्जुनसिंग नारायणसिंग सरदार (वय- ४१ वर्षे, रा. कोलारस, ता. कोलारस, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश) , २) सागरसिंग गुरजंदसिंग सरदार (वय-४४ वर्षे, रा. कोलारस, ता. कोलारस, जि. शिवपुरी, मध्यप्रदेश) असे असल्याचे सांगितले.

# महिलांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करणार - सौ. सोनियाताई राजदेव

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्ट च्या वतीने पौर्णिमेनिमित्त आरतीचे नियोजन करण्यात आले होते,

आणि यावेळी टाकळी ढोकेश्वर जिल्हापरिषद गटाच्या इच्छुक उमेदवार सोनियाताई राजदेव यांनी हळदी कुंकु कार्यक्रमाचे नियोजन केले होते ,यावेळी मोठ्या संख्येने माता भगिनी ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी सोनियाताई राजदेव म्हणाल्या महिलांना सक्षमीकरण करणे काळाजी गरज आहे ,आता पर्यंतच्या इतिहासात फक्त चूल आणि मूल ह्या गोष्टीमुळे महिलांची प्रगती थांबलेली होती ,

परंतु आजच्या काळात महिला शिकल्यामुळे विविध क्षेत्रात महिला प्रगतीवर आपल्याला पाहायला मिळत आहे . या कार्यक्रम प्रसंगी श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष बबनशेठ उंडे , हा भ प धनंजय महाराज उदावंत, हा भ प बजरंग महाराज आंधळे,उपाध्यक्ष,तसेच सचिव सुभेदार आंधळे मेजर ,तुकाराम कोकाटे , हरिशेठ उंडे , कृष्णा कोकाटे ,रायचंद मुळे ,सचिन वाफारे, विश्वनाथ दरेकरत्याच बरोबर कार्यक्रमाचे आयोजन वर्षाताई मुळे, पुष्पा आंधळे , सुशाबाई कोकाटे तसेच संगीता आंधळे , नंदबाई मुळे , अनिता कोकाटे ,संध्या आंधळे ,विद्या वाफारे,स्वाती आंधळे ,रतन कोकाटे आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

हळदी कुंकू चालू होण्यापूर्वी देवस्थानच्या वतीने सोनियाताई राजदेव यांचा ट्रस्टच्या वतीने सन्मान करून शुभेच्या दिल्या.

# AI व ई-तंत्रज्ञानाद्वारे उच्च शिक्षणात परिवर्तन विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

**अहमदनगर : (समर्थ गांवकरी)**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर) येथे “Transforming Higher Education Through AI, E-Content and Electronic Technologies” या विषयावर एक दिवसीय आंतरशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे. या चर्चासत्राचे आयोजन IQAC तसेच रसायनशास्त्र, भूगोल व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून, उच्च शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ई-कंटेंट आणि इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने घडणाऱ्या शैक्षणिक परिवर्तनावर सखोल चर्चा करण्यात येणार आहे. चर्चासत्रात AI-आधारित वैयक्तिक शिक्षण, स्मार्ट क्लासरूम्स, डिजिटल कॅम्पस, ई-असेसमेंट सिस्टिम, MOOCs, ब्लेंडेड लर्निंग, NEP-2020 अंतर्गत डिजिटल परिवर्तन आदी विषयांवर तज्ज्ञ वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेसाठी प्रा. संजय धोबल (Dnyan Prasad Global University, Pune), डॉ. किरणकुमार जोहरे (AI Expert, Nashik) व प्रा. दिगंबर घोडके हे मान्यवर वक्ते लाभणार आहेत. या राष्ट्रीय चर्चासत्रात देशभरातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. सदरील चर्चासत्राचे समन्वयक भूगोल विभागाचे प्रा. किशोर कांबळे तर सहामन्वयक वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. सुदाम वीर हे आहेत.

# रुग्णसेवेसाठी सामाजिक बांधिलकी

## पारनेर ग्रामीण रुग्णालयाचा पाणीप्रश्न लोकसहभागातून सुटला



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील गोरगरीब रुग्णांसाठी आधारवड असलेल्या पारनेर ग्रामीण रुग्णालयातील पाण्याची गंभीर समस्या अखेर सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारामुळे सुटली आहे. कूपनलिकेची मोटार नादुरुस्त झाल्याने निर्माण झालेल्या या टंचाईवर मात करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीं काशीनाथ दाते सर,, सावित्री फातिमा सदभावना मंचचे कार्याध्यक्ष डॉ रफिक सय्यद आणि पाणी पुरवठा सभापती योगेश मते यांनी टँकरद्वारे पाणीपुरवठा करून रुग्णांना मोठा दिलासा दिला आहे. पारनेर ग्रामीण रुग्णालय हे तालुक्यातील आरोग्यसेवेचे मुख्य केंद्र आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून येथील कूपनलिकेची (बोअरवेल) मोटार अचानक नादुरुस्त झाली. यामुळे रुग्णालयाचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता. रुग्णालयातील स्वच्छतेपासून ते रुग्णांच्या दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या पाण्याअभावी प्रशासनाची मोठी ओढाताण होत होती. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत होती, ही बाब अत्यंत गंभीर बनली होती.

रुग्णालयाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. मृणाली पाटील यांनी या समस्येला दुजोरा दिला होता. ही बाब स्थानिक ग्रामस्थ भगवान गायकवाड यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. गायकवाड यांनी या प्रश्नी आमदार काशीनाथ दाते (सर) यांना फोन करून परिस्थितीचे गांभीर्य मांडले. आमदार दाते यांनी तातडीने दखल घेत रुग्णालय प्रशासनाला शासकीय पातळीवर तांत्रिक दुरुस्तीचे आदेश दिले.

मात्र, तांत्रिक काम पूर्ण होण्यास वेळ लागणार असल्याने तोपर्यंत रुग्णांची होणारी हेळसांड थांबवणे गरजेचे होते. रुग्णालयातील हौद रिकामे असल्याने डॉक्टरांनाही रुग्णांना उपचार देताना मर्यादा येत होत्या. रुग्णांची ही गैरसोय पाहून भगवान गायकवाड यांनी पारनेर शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे 'सावित्री फातिमा सद्भावना मंच'चे कार्याध्यक्ष डॉ. रफिक सय्यद यांच्याशी संपर्क साधला. डॉ. सय्यद यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून कोणताही विलंब न लावता स्वखर्चाने १०,००० लिटर क्षमतेचा पाण्याचा टँकर रुग्णालयासाठी उपलब्ध करून दिला.

याचबरोबर, पारनेर नगरपंचायतीचे पाणीपुरवठा सभापती योगेश मते यांनीही सामाजिक भावनेतून ५,००० लिटर पाण्याचा टँकर तातडीने रुग्णालयात पाठवून दिला. या मदतीमुळे रुग्णालयातील पाण्याचे साठवण हौद भरले गेले आणि रुग्णांचा पाण्याचा प्रश्न तात्पुरता मार्गी लागला.

वेळेवर पाणी उपलब्ध झाल्यामुळे रुग्णालयातील स्वच्छतेचा प्रश्न सुटला असून रुग्णांना मोठा आधार मिळाला आहे. कठीण प्रसंगात शासकीय निधीची वाट न पाहता, सामाजिक भावनेतून धावून येणाऱ्या आमदार काशीनाथ दाते (सर), डॉ. रफिक सय्यद, नगरसेवक योगेश मते , भगवान गायकवाड यांचे रुग्णालय प्रशासन आणि नागरिकांकडून आभार मानले जात आहेत.

"रुग्णांची सेवा हेच आमचे कर्तव्य आहे. पाण्याअभावी रुग्णांचे हाल होत असल्याचे समजताच आम्ही तातडीने मदतीचा निर्णय घेतला. भविष्यातही अशा कामांसाठी आमचा मंच सदैव तत्पर राहील

**— डॉ. रफिक सय्यद (कार्याध्यक्ष, सावित्री फातिमा सद्भावना मंच, पारनेर.**

# मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी!



## संपादकीय

गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलियानं एक ऐतिहासिक कायदा मंजूर केला. त्यानुसार १६ वर्षांखालील मुलांसाठी इन्स्टाग्राम, टिकटॉक, फेसबुकसारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स वापरण्यावर बंदी घालण्यात आली. मुलांसाठी सोशल मीडिया किती धोकादायक आहे आणि मुलांचा मेंदू त्यामुळे किती सुस्त आणि आळशी होतो आहे, हे अनेकानेक संशोधनांतून सिद्ध झाल्यामुळे अनेक देश आता मुलांसाठी सोशल मीडिया वापराबाबत अतिशय गंभीर झाले आहेत. ऑस्ट्रेलियानंतर आता फ्रान्सनेही मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याची पूर्ण तयारी केली आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी नुकतंच जाहीर केलंय, फ्रान्समध्ये सप्टेंबरपूर्वी १५ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातली जाईल. मॅक्रॉन म्हणाले, आमच्या देशातील मुलांचा मेंदू विकाऊ नाही. मुलांसाठी सोशल मीडियावर निर्बंध असतील आणि हायस्कूलमध्ये मोबाइल फोनवरही बंदी असेल. हा नियम मुलं, पालक आणि शिक्षक या सर्वांसाठी पूर्णपणे स्पष्ट असेल. फ्रान्सचा हा निर्णय अशा वेळी आलाय, जेव्हा पाश्चिमात्य देशांमध्ये मुलांना सोशल मीडियापासून वाचवण्यासाठी कडक कायदे करण्याचे प्रयत्न वेगाने सुरू आहेत.

मॅक्रॉन यांच्या घोषणेनंतर काही दिवस आधीच ब्रिटन सरकारनंही सांगितलं होतं की, मुलांना ऑनलाइन सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक पर्यायांवर विचार सुरू आहे. यामध्ये १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचाही समावेश आहे. फ्रान्समध्ये या प्रस्तावाचं नेतृत्व मॅक्रॉन यांच्या पक्षाच्या खासदार लॉर मिलर करत आहेत. त्यांनी सांगितलं की, सध्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वयाची योग्य तपासणी होत नाही. कोणतीही व्यक्ती फक्त जन्मतारीख टाकून सहज अकाउंट बनवू शकते. सरकारची इच्छा आहे की, युरोपियन डिजिटल सर्व्हिसेस ॲक्टअंतर्गत प्लॅटफॉर्मवर कठोरपणे खरी वयाची पडताळणी बंधनकारक केली जावी. याचा अर्थ असा होईल की, युजरला तो १५ वर्षांहून मोठा आहे की नाही, हे सिद्ध करावं लागेल. ऑस्ट्रेलियात मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घातल्याचा अतिशय मोठा सकारात्मक परिणाम पाहायला मिळाला. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी सांगितलं, १६ वर्षांखालील मुलांशी संबंधित सुमारे ४७ लाख सोशल मीडिया अकाउंट बंद किंवा हटवण्यात आले आहेत. बंदी लागू होण्याच्या अगोदर अल्बानीज यांनी ऑस्ट्रेलियन किशोरवयीन मुलांना आवाहन केलं होतं की त्यांनी एखादा नवा खेळ खेळणं सुरू करावं, एखादं संगीतवाद्य शिकावं किंवा पुस्तकांचं वाचन करावं, त्यांची गोडी लावावी.




भारतामध्येही दिल्ली हायकोर्टानं ऑगस्ट २०१३मध्ये के. एन. गोविंदाचार्य प्रकरणात आदेश दिला होता की, अल्पवयीन मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्म जॉइन करता येणार नाही आणि वयाची योग्य तपासणी करणं ही कंपन्यांची जबाबदारी आहे. हायकोर्टाचं मत होतं की, सोशल मीडिया मुलांसाठी धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे प्लॅटफॉर्मनी खात्री करावी की १८ वर्षांखालील मुलं पालकांच्या परवानगीशिवाय सोशल मीडिया वापरणार नाहीत. मात्र या आदेशानंतरही प्रत्यक्षात त्याची कडक अंमलबजावणी झाली नाही. ना सोशल मीडिया कंपन्यांनी वयाची प्रभावी तपासणी व्यवस्था लागू केली, ना सरकारनं ठोस देखरेख यंत्रणा उभी केली.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 6 | | 3 | 1 | 8 | | |
| 2 | | | 5 | 8 | | 4 | 1 | 3 |
| | 3 | | | 7 | | 9 | | 5 |
| | | | | | 3 | | | |
| | | 7 | | 2 | | 5 | | |
| | | | 7 | | | | | |
| 6 | | 8 | | 1 | | | 9 | |
| 7 | 1 | 2 | | 9 | 4 | | | 8 |
| | | 3 | 6 | 5 | | 1 | 7 | |

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७८ चे उत्तर



उत्तर उद्याच्या अंकात

| पंचांग | अयन- उत्तरायणारंभ | नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी |
|---|---|---|
| ४ फेब्रुवारी २०२५ | मास- माघ | २२:१२:३० |
| बुधवार | ऋतु- सौर शिशिर | योग:अतिगण्ड |
| विक्रम संवत्- २०८२ | कृष्ण पक्ष | २५:०४:०३+ |
| माघ शके संवत्- १९४७ | तिथि:तृतीया | करण:वणिज १२:२०:०० |
| संवत्सर - विश्वावसूनाम | २४:०९:४७+ | करण:विष्टि २४:०९:४७+ |

## उपदेशाचे डोस

### वक्तशीरपणा

'तिसरी कसम' या चित्रपटाचे चित्रीकरण बिहारमधील पूर्णिया जवळच्या जंगलात सुरू होते. दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांना अगदी पहाटेचे एक दृश्य चित्रित करायचे होते म्हणून त्यांनी नायक राजकपूर यांच्या स्वीय सहायकाला दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला हजर राहण्यास सांगितले. त्याने राजकपूरना हा निरोप देण्यास साफ इन्कार केला. 'त्यांचा दिवस सकाळी अकरा वाजता सुरू होतो हे मला ठाऊक असताना माझी हिंमतच होणार नाही त्यांना पहाटे या म्हणून सांगायला.' मग दिग्दर्शक बासू भट्टाचार्य यांनीच ते काम स्वीकारले. ते राजकपूरला म्हणाले, 'उद्या मला दोन मोठ्या लोकांना बरोबर घेऊन काम करायचे आहे. वेळ पहाटे साडेपाचची आहे. मात्र, ती चुकली तर त्यातला एक मोठा माणूस निघून जाईल... एक मोठा माणूस म्हणजे साक्षात् सूर्यनारायण व दुसरे आपण स्वतः आहात.' दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला सर्वांच्या आधी राजकपूर स्वतः पोहोचलेले होते. एवढेच नाही तर संपूर्ण युनिटसाठी त्यांनी चहादेखील तयार ठेवलेला होता. सर्वांना शरमल्यासारखं झालं. राजकपूर कामात आपलं भान हरपून जातात हे साऱ्यांना पुन्हा एकदा कळलं.

कथा उपदेश : मोठी माणसं आपल्या कामाला नेहमी सर्वोच्च अग्रक्रम देतात.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९७ - क्युटो, इक्काडोरमध्ये भूकंपाने ४०,००० ठार.
- १८४७ - मॅरीलंडमध्ये पहिली यूएस टेलीग्राफ कंपनीची स्थापना.
- १८७५ - बेलजीयमच्या गोथा येथे राजकुमारी लुईसीने राजकुमार फलीप वोनशी विवाह केला.
- १९९० - काहिराजवळ १० इस्त्राईली पर्यटकांची हत्या झाली.
- २००८ - अती वेगवान शर्यतीचा माजी विश्व विजेता अमेरिकाचा मॉरिस ग्रीनने ॲथलेटिक्समधून निवृत्ती घेतली.

### राष्ट्रीय

- २००७ - दोडात बस नदीत कोसळून १३ जण ठार.
- २००७ - सचिन तेंडुलकरचा विदेशात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम.


### जन्म

- १८९७ - जर्मनीचे पंतप्रधान लुडवीग इरहर्ड यांचा जन्म.
- १९०६ - यूएसचे ज्योतिषी सीलेंड विलीयम टोमबग यांचा जन्म.
- १९१७ - पाकिस्तानचे नेते आगा याहया खान यांचा जन्म.
- १९२२ - 'भारत रत्न' पंडित भिमसेन जोशी यांचा जन्म.
- १९४८ - भारताचे फिरकी गोलंदाज राकेश शुक्ला यांचा जन्म.

### निधन

- १९२८ - भौतिकवादी हेनड्रीक ए. लोरेंट्ज यांचे निधन.
- १९५८ - बेलजियनचे राजकुमार फ्रीड्रीक डी मेरोड यांचे निधन.
- १९६६ - नॅशनल जॉगरोफीक सोसायटीचे अध्यक्ष गलबर्ट एद्वा. ग्रोसवेनर यांचे निधन.
- २००८ - अध्यात्मिक गुरू गगनगिरी महाराज यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७९



**आडवे शब्द**

१. नारळाचा अर्धा भाग
३. मालिश
५. पाऊल
९. खटला, दावा
१०. थांबून थांबून, विश्रांती घेत
१२. नेत्रकटाक्ष
१५. राग आणणारे
१८. औषधाचे प्रमाण
१९. कार्य, काज
२०. एकाच्या हातून दुसऱ्याच्या हाती अशाप्रकारे
२१. झाकण असलेले पात्र
२३. विष्ठेचे खत
२४. माणूस
२६. वर्तमानपत्रातील कप्पा
२८. अपवित्र
३०. कर्ण
३१. रसाळ
३३. अनावश्यक, नको असता
३५. कावळ्याचे ओरडणे
३६. बाजेची कापडी पट्टी
३७. अपशकुन
३८. कुरआनातील आयात (ि‍क)
३९. मारणे
४१. संभाषण
४६. चेहऱ्यावरील कांती
४९. विद्वत्ता असली तरी घमेंड नको हे सांगणारा वाक्प्रचार
५३. तारांब, धांदल
५५. चंद्राची कड
५६. नामी युक्ती
५८. पातळसर
६०. मुलांची मांजर
६१. सगळी
६२. शाहीराजवळचे चर्मवाद्य
६३. दक्ष
६५. धनादेश
६७. तरूण्य
६८. उत्तराधिकारी
७०. ऐनवेळेला कच खाणारा
७३. पत्नी
७५. ऋण
७६. राख
७७. वाळलेले गवत, जनावरांचे खाद्य
७८. पसरलेले, विस्तृत

**उभे शब्द**

१. दयामया नसलेला
२. नमस्कार
३. गम्माडीगंमत
४. मानवी कत्तल
५. गुरांचा समूह
६. कामदेव
७. आनंद
८. सुंदर डोळ्यांची
९. पदार्थाचा सूक्ष्म भाग
१०अ. वानर
११. कामापुरते नाते
१३. मृत्यूदेवता
१४. चोख सोन
१६. वडील
१७. तरूण, सैनिक
२०. यालाच जगन्नाथ समजावे!
२२. पोते
२३. शिडी, पायरी
२४. माणुसकी
२५. आशीर्वाद
२७. कृती
२९. न दिसणारी जखम
३०. चुलता
३२. पशू
३४. शक्ती, क्षमता
४०. बाराचा संच (इंग्रजी)
४२. बातमी
४३. शास्त्र, कला
४४. अंत:करण
४५. आत्याचा मुलगा
४७. देवदर्शनासाठी फिरणारा
४८. अधिक श्रेष्ठ
४९. दगाफटका करणारा
५०. नम्र
५१. कर्जाऊ रक्कम
५२. दु:ख
५४. घर
५६. हिशोब (हिंदी)
५७. तत्काळ, लगेच
५९. शरीराची ठेवण
६३. शिर्डीचे संत
६४. अभिनव
६५. उत्साह, जोम
६६. सिंह राशीतील नक्षत्र
६९. पुढचे पाठ आणि मागचे ---!
७०. लेखी विनंती
७१. ताठा, गर्व
७२. एखाद्याची बाजू घेणे, कार्यात हातभार लावणे म्हणजे -- उचलणे
७४. वरिष्ठांचा राग, संताप

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ७८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.नाशवंत ३.वसुंधरा ५.आडमिळकत ९.फासा १०.माकड १२.मळ १३.माननीय १६.गाळसाळ १८.यमसदनाला पाठविणे २४.राका २५.दानपत्र २७.नाविक दल २८.रमावर ३०.सुळका ३१.माता ३२.वण ३३.रसना ३४.जमा ३६.नाद ३७.राधा ३८.हवन ३९.राजीव लोचन ४०.खरडपट्टी ४२.परि ४३.कास ४५.तव ४६.येन ४७.राबता ४८.मनमुराद ५०.ताई ५२.दास ५३.जंगली जनावर ५५.महाशय ५७.नकार ५९.बासरी ६०.दम ६१.लगत ६३.करारमदार ६४.पारावार ६५.महाराज ६६.कारभार

उभे उत्तर : १.नाममात्र २.वंदनीय ३.वसा ४.रमा ५.आड ६.मिसळ ७.कमळ ८.तळ ११.कवठ १४.यमसदन १५.विनाकारण १६.गाणे १७.सामानसुमान १९.दरा २०.पाचावर धारण बसणे २१.विष २२.पत्रकार परिषद २३.कविता २६.पळ २७.नामनिराळा २९.रस ३२.वदन ३४.जव ३५.अवयव ३६.नाचता येईना ३७.राख ३८.हट्टी ४१.पल्ला ४३.कान ४४. समुदाय ४५.तवंग ४८.मनोहारी ४९.रास ५०.ताजगी ५१.सरकार ५३.जंगल ५४.वनराज ५५.मस ५६.समरस ५८. रमणी ५९.बारका ६०.दवा ६२.तम ६३.करा ६४.पार

# नगर जिल्ह्यात सहकार क्षेत्रात खळबळ : सचिव केडर नियुक्तीत मोठा घोळ?

- २०१२ पासून काम करणाऱ्यांवर अन्याय, चौकशीची जोरदार मागणी!
- ९१ जिल्हा सचिवांचा मार्ग कोणी रोखला!
- जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांची मात्र सारवा सारव!






**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

(समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात सध्या वरवर आनंदाचे वातावरण दिसत असले, तरी पडद्यामागे मात्र तीव्र असंतोष आणि संतापाची लाट उसळली आहे. अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकारी सेवा सोसायटींच्या सचिवांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप पुढे येत असून, या संपूर्ण प्रकरणात जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या भूमिकेवर संशयाची सुई वळली आहे. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या डोळ्यांत धूळफेक करून तब्बल 51 सचिवांची फसवणूक झाली नाही ना? असा संतप्त सवाल सहकार क्षेत्रातून व्यक्त होत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांमध्ये सचिव हा सर्वात महत्त्वाचा, प्रेरणादायी आणि कार्यक्षम घटक मानला जातो. सहकार संस्थांची दैनंदिन कामकाजाची जबाबदारी सांभाळणाऱ्या या सचिवांना केडरमध्ये समाविष्ट करावे, यासाठी जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील सचिवांनी अनेक वर्षे संघर्ष केला. बळीराजा जसा मेघराजाची वाट पाहतो, तशीच या सचिवांनी केडर नियुक्तीची आशा ठेवली. मात्र प्रत्यक्षात काय घडले, हा प्रश्न आज ऐरणीवर आहे.

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे, सन 2012 पासून सहकार संस्थांसाठी काम करणाऱ्या सचिवांना घरचा रस्ता दाखवण्यात आला का? आणि 2017 नंतर रुजू झालेल्या सचिवांना मात्र केडरमध्ये नियुक्ती देण्यात आली का?

जर असे असेल, तर हा अन्यायकारक आणि संशयास्पद निर्णय नाही काय, असा सवाल उपस्थित होत आहे. जिल्हा उपनिबंधकांना या जिल्ह्याच्या सहकार चळवळीचा इतिहास माहित नाही का, की मंत्रालयातील अधिकाऱ्यांच्या 'लाडासाठी' चुकीच्या पद्धतीने निर्णय घेतले जात आहेत, अशी तीव्र टीका होत आहे.

सहकार क्षेत्रात कार्यरत असलेल्या काही अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप होत आहेत.

"मंत्रालयातील अधिकारी आले, साहेब आले – चला पतसंस्था सचिवांकडून पैसे गोळा करा आणि त्यांना लाड पुरवा," अशी संस्कृती या जिल्ह्यात चालणार नाही, असा इशारा पत्रकार संघटनांनी दिला आहे.

ज्या सचिवांनी 2012 पासून सहकार संस्थांसाठी रक्ताचे पाणी केले, त्यांच्या केडर नियुक्त्या आजही प्रलंबित का आहेत? दोषी कोण? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

याउलट, सन 2017 ते 2024 या कालावधीत हजर झालेल्या सचिवांना मात्र केडर नियुक्त्या मिळाल्या, अशी माहिती समोर येत आहे. हा भेदभाव योग्य आहे का, यावर तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

नगर जिल्हा बँकेच्या भरती प्रक्रियेतही यापूर्वी पत्रकारांनी परखड भूमिका मांडली होती. त्यामुळे याही प्रकरणात कोणीही असो – अधिकारी असो वा मंत्री – चुकीच्या कामाविरोधात न्यायालयात जाण्याची तयारी असल्याचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने स्पष्ट केले आहे.

आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी होणार?

या नियुक्त्यांदरम्यान एका सचिवाच्या नियुक्तीसाठी किती रकमेची मागणी झाली?

पैसे कोणी मागितले?

पैसे कोणी गोळा केले?

ही रक्कम कोणासाठी आणि कुठपर्यंत पोहोचली?

या सर्व बाबींची मंत्रालयापासून तळागाळापर्यंत संपूर्ण आर्थिक चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दैनिक समर्थ गांवकरी या प्रकरणाचा पाठपुरावा करणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.विशेष म्हणजे, पंधरा दिवसांपूर्वी भंडारा विभागात फिरण्यासाठी आलेल्या मंत्रालयातील अधिकाऱ्यांसाठी सहकार सचिव, सोसायट्या व पतसंस्थांकडून वर्गणी गोळा करण्यात आल्याची चर्चा आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या 'लाडासाठी' सहकारी संस्था तत्पर असतात, मात्र पत्रकारांनी दिलेल्या जाहिरातींचे बिल देण्यासाठी वेळ नसतो, ही बाब पतसंस्था चालकांनाही खटकत आहे.

जिल्हा उपनिबंधकांची प्रतिक्रिया – अपुरी? या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्याशी संपर्क साधला असता,

"प्रस्ताव आयुक्तांकडे पाठवला आहे, लवकरच मंजूर होईल,"

अशी केवळ दोन शब्दांत सौम्य प्रतिक्रिया देऊन त्यांनी मोकळे होणे पसंत केले.

मात्र एवढ्या गंभीर विषयावर ही प्रतिक्रिया पुरेशी आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

मंत्र्यांनी स्पष्ट भूमिका घ्यावी!

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व सहकार मंत्री पंकज भोईर यांनी या संपूर्ण प्रकरणात तातडीने लक्ष घालावे आणि सत्य बाहेर आणावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

"येथे कुठेतरी माशी शिंकलेली आहे," असे स्पष्ट सांगत, या प्रश्नाचे उत्तर संबंधितांना द्यावेच लागेल, असेही पत्रकार संघटनांनी ठणकावून सांगितले आहे. नगर जिल्ह्यातील निर्भीड पत्रकारिता आजही भ्रष्टाचाराविरोधात उभी आहे. कोतुळ पॅटर्न जसा उघडकीस आला, तसाच जिल्ह्यातील 14 तालुक्यांतील नव्याने समाविष्ट झालेल्या सर्व सचिवांच्या कामाची सखोल चौकशी व्हावी, ही ठाम मागणी करण्यात आली आहे.

## बायोमेट्रिक हजेरी आणि ९१ सचिवांचा प्रश्न

जिल्हा बँकेने नियुक्त केलेल्या नवीन सचिवांची बायोमेट्रिक प्रणालीद्वारे हजेरी, दैनंदिन कामकाजानुसारच वेतन देण्याची मागणीही करण्यात आली आहे. जोपर्यंत 91 सचिवांचा प्रश्न मार्गी लागत नाही, तोपर्यंत हा लढा क्रमशः सुरू राहील, असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. ही सर्व मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी निवेदनाद्वारे मांडली असून, सहकार क्षेत्रातील या कथित गैरप्रकारांवर राज्य शासनाने तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भारतात हायरिंग प्रक्रिया अधिक आव्हानात्मक

मुंबई : (समर्थ गांवकरी)




भारतातील हायरिंग बाजार वेगाने विस्तारत असला, तरी योग्य टॅलेंट शोधणे रिक्रूटर्ससाठी अधिकच कठीण होत असल्याचे चित्र समोर आले आहे. LinkedInच्या नव्या संशोधनानुसार, ७४ टक्के रिक्रूटर्सना पात्र उमेदवार शोधण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक वेळ आणि प्रयत्न करावे लागत आहेत. याच कालावधीत, हायरिंगचे प्रमाण महामारीपूर्वीच्या तुलनेत तब्बल ४० टक्क्यांनी वाढले आहे. या आव्हानामागील प्रमुख कारण म्हणजे अर्जांची संख्या आणि उमेदवारांच्या गुणवत्तेमधील वाढती तफावत. अर्ध्याहून अधिक रिक्रूटर्स (५३%) एआय-निर्मित अर्जांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे सांगतात, तर ४७ टक्के रिक्रूटर्स मागणीतील कौशल्यांची सातत्याने कमतरता असल्याचे नमूद करतात. जवळपास ४८ टक्के रिक्रूटर्ससाठी कमी दर्जाचे किंवा दिशाभूल करणारे अर्ज वेगळे करणे ही मोठी डोकेदुखी ठरत असून, त्यामुळे संपूर्ण हायरिंग प्रक्रिया संथ होत आहे.

याचा थेट परिणाम म्हणजे कामगार बाजारपेठेत प्रचंड स्पर्धा वाढली आहे. लिंक्डइन प्लॅटफॉर्मवरील डेटानुसार, भारतात प्रत्येक रिक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या २०२२ पासून दुपटीहून अधिक झाली आहे. तसेच, ७२ टक्के प्रोफेशनल्स सांगतात की ते २०२६ मध्ये सक्रियपणे नोकरी शोधत आहेत, मात्र ८५ टक्क्यांना या प्रक्रियेसाठी आपण पुरेसे सज्ज नसल्याची भावना आहे. या वाढत्या दबावाच्या पार्श्वभूमीवर, रिक्रूटर्स एआयला प्रभावी उपाय म्हणून स्वीकारत आहेत. भारतातील एआयचा वापर करणाऱ्या ७१ टक्के रिक्रूटर्सचे म्हणणे आहे की, एआयमुळे त्यांना अशा उमेदवारांचा शोध घेता आला, ज्यांच्याकडे योग्य कौशल्ये असूनही ते यापूर्वी त्यांच्या नजरेत आले नव्हते.

# दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस विलीनीकरणास भाजपचा विरोध

मुंबई : (समर्थ गांवकरी)

अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात सध्या दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्रिकरणाची चर्चा सुरू आहे. यावर राष्टवादी अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी दिल्लीत पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. यांच्यात एकत्रिकरण यावर चर्चा झाल्याची माहिती आहे. यावेळी अमित शहा यांनी या लोकांना यात राजकारण दिसत आहे असं विधान प्रफुल्ल पटेल यांच्या समोर केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# प्रगत रेडियोफ्रीक्वेंसी एब्लेशन उपचारामुळे तीव्र वेदनांनी त्रस्त पुण्यातील कर्करोग रुग्णाच्या जीवनमानात मोठी सुधारणा

पुणे : (समर्थ गांवकरी)

जागतिक तसेच भारतीय वैद्यकीय अभ्यासांनुसार, प्रगत टप्प्यातील कर्करोग असलेल्या सुमारे ६० ते ७० टक्के रुग्णांना मध्यम ते तीव्र वेदना सहन कराव्या लागतात, तर जवळपास एक-तृतीयांश रुग्णांच्या वेदनांवर पुरेसे उपचार होत नाहीत. प्रगत वेदनाशमन उपचार उपलब्ध असतानाही, माहितीअभावी किंवा उशिरा माहिती मिळाल्यामुळे अनेक रुग्ण वेळेवर हा उपचार घेऊ शकत नाहीत.

कर्करोगामुळे दीर्घकाळ तीव्र वेदना सहन करणाऱ्या ५६ वर्षीय महिला रुग्णावर पेनेक्स क्लिनिक येथे एडवांस्ड रेडियोफ्रीक्वेंसी एब्लेशन उपचार यशस्वीरीत्या करण्यात आले असून, कर्करोग उपचारांमध्ये विशेष वेदनाशमन किती महत्त्वाचे आहे, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. सदर रुग्णावर फुफ्फुसातील मॅलिग्नेंट मेसोथेलियोमा या कर्करोगासाठी उपचार सुरू होते. गेल्या अनेक महिन्यांपासून तीव्र वेदनांमुळे त्यांचे दैनंदिन जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते. ज्यामुळे नीट बसणे, साधी घरकामे करता येत नव्हती आणि रात्री सलग झोप येणेही अशक्य झाले होते. अनेक वेदनाशामक औषधे सुरू असूनही वेदनांमध्ये अपेक्षित आराम मिळत नव्हता आणि त्यांचे जीवनमान मोठ्या प्रमाणात खालावले होते. पेनेक्स क्लिनिक येथे आल्यानंतर रुग्णाची सखोल वेदना तपासणी करण्यात आली. तपासणी अहवालांच्या आधारे डॉक्टरांनी एडवांस्ड रेडियोफ्रीक्वेंसी एब्लेशन या मिनिमली इनव्हेसिव्ह आणि इमेज-गाईडेड उपचार पद्धतीचा निर्णय घेतला. या पद्धतीत वेदना निर्माण करणाऱ्या नसा अचूकपणे शोधून त्यावर उपचार केले जातात, त्यामुळे वेदनांमध्ये लक्षणीय आराम मिळतो. उपचारानंतर अवघ्या पाच ते सहा दिवसांत रुग्णाच्या वेदनांमध्ये लक्षणीय घट झाली. त्यामुळे पुन्हा स्वतः दैनंदिन कामे करू लागल्या असून, त्यांची हालचाल, झोप आणि एकूणच जीवनमानात स्पष्ट सुधारणा दिसून आली आहे.

या बद्दल बोलताना पेनेक्स क्लिनिक चे संस्थापक आणि संचालक डॉ. काशीनाथ बंगार म्हणाले, "आजही वेदना हा कर्करोगाचा अविभाज्य भाग आहे, अशी समजूत अनेकांच्या मनात आहे, जी पूर्णपणे चुकीची आहे. एडवांस्ड रेडियोफ्रीक्वेंसी एब्लेशन सारख्या प्रगत वेदनाशमन उपचार पद्धती सुरक्षित, प्रभावी आणि उपलब्ध आहेत; मात्र त्याबाबत रुग्णांना माहिती नसते किंवा ते खूप उशिरा योग्य तज्ज्ञांकडे रेफर होतात.

# गुंतवणूकदारांसाठी चालना : कोटक सर्व्हिसेस फंड सुरू

मुंबई : (समर्थ गांवकरी)

kotak Mutual Fund

कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड ("KMAMC"/"कोटक म्युच्युअल फंड") ने कोटक सर्व्हिसेस फंड या सेवा-आधारित थीमवर आधारित ओपन-एंडेड इक्विटी योजनेची घोषणा केली आहे. ही नवीन फंड ऑफर (NFO) गुंतवणूकदारांना भारताच्या मुख्य वाढीच्या इंजिनमध्ये – सेवा क्षेत्रात – गुंतवणुकीची संधी देते. सेवा क्षेत्र देशाच्या GVA (ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड) मध्ये 55% योगदान देते आणि देशातील 31.5% कामगारांना1 रोजगार देते. ग्राहक सेवा, दूरसंचार, आरोग्यसेवा, लॉजिस्टिक्स, वित्तीय सेवा, आयटी, ऊर्जा आणि तेल व वायू यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये जलद वाढ होत आहे. त्यामुळे भारताची सेवा अर्थव्यवस्था दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी* अनेक संरचनात्मक वाढीचे घटक उघड करत आहे. कोटक सर्व्हिसेस फंड ही बहुआयामी संधी ग्रोथ ॲट रिझनेबल प्राइस (GARP) आणि BMV फ्रेमवर्क (बिझनेस, मॅनेजमेंट,व्हॅल्यू) या शिस्तबद्ध गुंतवणूक धोरणाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न करेल. हा फंड सर्व प्रकारच्या मार्केट कॅपिटलायझेशनमध्ये गुंतवणूक करेल, ज्यामध्ये मजबूत रोख प्रवाह, स्केलेबल मॉडेल्स आणि दीर्घकालीन कंपाउंडिंग क्षमता असलेल्या गुणवत्तापूर्ण व्यवसायांवर लक्ष केंद्रित केले जाईल. निलेश शाह, व्यवस्थापकीय संचालक, कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड यांनी सांगितले, "भारताची सेवा अर्थव्यवस्था संरचनात्मक बदलातून जात आहे. वाढती उत्पन्ने, डिजिटल स्वीकार आणि शहरीकरण यामुळे भारतीयांच्या उपभोग, व्यवहार आणि आवश्यक सेवांमध्ये प्रवेश करण्याच्या पद्धती बदलत आहेत. कोटक सर्व्हिसेस फंड द्वारे आम्ही अशा संधींना पकडणारे पोर्टफोलिओ तयार करण्याचा प्रयत्न करत आहोत, ज्यामुळे गुंतवणूकदारांना दीर्घकालीन मूल्य मिळेल." रोहित टंडन, कोटक सर्व्हिसेस फंडचे फंड मॅनेजर म्हणाले, "सेवा-आधारित थीममध्ये उपभोग-आधारित आणि निर्यात-आधारित विभागांचा समावेश असल्यामुळे स्थिरता आणि वाढ दोन्ही मिळतात. आमच्या दृष्टीने, सेवा क्षेत्र हे भारताच्या बाजारपेठेत लवचिकता आणि विस्तारक्षमता यांचे सर्वात आकर्षक संयोजन आहे. कोटक सर्व्हिसेस फंडमध्ये आमचे पोर्टफोलिओ बांधणी अशा कंपन्यांकडे झुकलेले असेल ज्यांनी नफा टिकवून ठेवण्याची क्षमता दाखवली आहे, व्यवसाय मॉडेल्स सुधारले आहेत आणि भांडवल शिस्तबद्धपणे वापरले आहे. आमचा गुंतवणुकीवरील विश्वास असा आहे की अशा कंपन्यांची शिस्तबद्ध निवड गुंतवणूकदारांसाठी स्थिर आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मितीत रूपांतरित होऊ शकते." कोटक सर्व्हिसेस फंड अशा काळात सुरू होत आहे जेव्हा भारतातील सेवा-आधारित उद्योग घरगुती, व्यवसाय आणि संस्थांच्या कार्यपद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहेत. ग्राहकांच्या अपेक्षा बदलत असताना आणि सेवा वितरणाचे मॉडेल्स अधिक प्रगत होत असताना, या क्षेत्रात अशा उद्योगांची जोरदार वाढ होत आहे जे विशेषीकरण, तंत्रज्ञान-सक्षम प्रक्रिया आणि कार्यक्षम शिस्त यांचा वापर करून प्रभावीपणे विस्तार करत आहेत. एनएफओमध्ये किमान ₹1000 गुंतवणूक करता येईल आणि ऑफर कालावधीत त्यानंतर कोणतीही रक्कम गुंतवता येईल. ही योजना अशा गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे जे सेवा-आधारित व्यवसायांमध्ये गुंतवणूक केलेल्या विविधीकृत पोर्टफोलिओद्वारे दीर्घकालीन भांडवली वाढ शोधत आहेत.

# झायडस पिंकॅथॉनचे सात वर्षांनंतर पुण्यात शानदार पुनरागमन

पुणे : (समर्थ गांवकरी)




सात वर्षांच्या खंडानंतर, झायडस पिंकॅथॉन पुण्यात परत येत आहे, जे भारतातील महिलांच्या सर्वात मोठ्या धावण्याच्या मंचांपैकी एक असलेल्या या स्पर्धेसाठी एक महत्त्वपूर्ण पुनरागमन आहे. शहरात शेवटची स्पर्धा २०१९ मध्ये आयोजित करण्यात आली होती. पुणे पर्वाचे अधिकृत अनावरण मंगळवारी हयात रीजन्सी पुणे अँड रेसिडेन्सेस येथे आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आले. या परिषदेला पिंकॅथॉनचे संस्थापक, अभिनेते आणि एंड्युरन्स आयकॉन मिलिंद सोमण, इन्व्हिन्सिबल वुमनच्या संस्थापिका अंकिता कोनवर आणि झायडस लाइफसायन्सेसचे अग्रगण्य कर्करोगतज्ञ डॉ. तुषार पाटील उपस्थित होते. या घोषणेने महिलांची फिटनेस, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि सहभागावर आधारित धावण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या झायडस पिंकॅथॉनच्या २०२५-२६ च्या देशव्यापी हंगामाची सुरुवात झाली आहे. पुणे येथील ही शर्यत ५ एप्रिल, २०२६ रोजी एएफएमसी ग्राउंड येथे होणार आहे. या हंगामातील मुंबई आणि बंगळूरु येथील यशस्वी आवृत्त्यांनंतर हयात रीजन्सी पुणे अँड रेसिडेन्सेस येथे ही घोषणा करण्यात आली. मुंबई व बंगळुरू आवृत्त्याना मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळाला आणि ज्यामुळे प्रमुख शहरांमध्ये झायडस पिंकॅथॉनचा वाढता प्रभाव अधोरेखित झाला. पुण्यात, हा प्लॅटफॉर्म समुदाय आणि सहनशक्तीच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपांसह परत येत आहे, तसेच महिलांच्या आरोग्यावर प्रकाश टाकत आहे, ज्यामध्ये लवकर निदान आणि नियमित स्व-स्तन तपासणीबद्दलच्या जागृतीचा समावेश आहे. पुणे आवृत्तीमध्ये झायडस पिंकॅथॉन चळवळीची विविधता आणि उद्देश दर्शवणाऱ्या मॅस्कॉट्सची एक दमदार फळी असेल. मृणाल इनामदार पारंपरिक नऊवारी साडी नेसून सुपर ७५ किमी गटाचे प्रतिनिधित्व करतील, तर दृष्टीहीन धावपटू ललिता पवार फॅब्युलस ५० किमी गटाचे नेतृत्व करतील. १०० किमी गटासाठी ६१ वर्षीय ईएनटी सर्जन डॉ. नीलम वैद्य मॅस्कॉट असतील, ज्या लवचिकता आणि आजीवन तंदुरुस्तीचे प्रतीक आहेत. १० किमी धावण्याचे प्रतिनिधित्व कर्करोगावर मात केलेल्या डॉ. मिताली उपाध्याय करतील, लाइफलॉंग ५ किमी गटाचे प्रतिनिधित्व पिंकॅथॉनचे संस्थापक मिलिंद सोमन यांच्या ८७ वर्षीय आई उषा सोमन करतील आणि ३ किमी गटाचे प्रतिनिधित्व आपल्या बाळाला सोबत घेऊन धावणारी आई मयुरी दास करेल, जी सर्वसमावेशक सहभागावर प्रकाश टाकते. या अनावरणप्रसंगी बोलताना, पिंकॅथॉनचे संस्थापक मिलिंद सोमण म्हणाले, "पुण्यात नेहमीच धावण्याची एक मजबूत संस्कृती राहिली आहे, आणि सात वर्षांनंतर येथे परत येणे विशेषतः अर्थपूर्ण वाटते. या हंगामात हा मंच संपूर्ण भारतात आपला प्रवास सुरू ठेवत असताना, पुणे हे एक महत्त्वाचे थांबे बनले आहे.

# मधुमेह व लठ्ठपणामुळे कर्करोगाचा धोका वाढला

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतात विशेष करून तरूण वयात मधुमेह आणि लठ्ठपणाचे वाढते प्रमाण हे चिंताजनक असून यामुळे कर्करोगाची जोखीम देखील वाढत आहे.त्यामुळे मधुमेह व लठ्ठपणाकडे फक्त जीवनशैलीशी निगडीत समस्या म्हणून न बघता गांभीर्याने बघण्याची गरज आहे,असे मत विविध तज्ञांनी व्यक्त केले. 4 फेब्रुवारीला जागतिक कर्करोग दिनानिमित्त लवकर निदान व उपचाराचे महत्त्व याबाबत जागरूकता निर्माण केली जाते. नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर येथील ऑंकोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ.मिनिष जैन म्हणाले की,चयापचयमधील असंतुलन आणि दीर्घकालीन दाहक स्थिती कर्करोगाच्या पेशींसाठी अनुकूल वातावरण निर्माण करतात. लठ्ठपणा हा एक प्रमुख जोखीम कारक घटक असून सध्या किमान 13 प्रकारच्या कर्करोगांशी असलेल्या जोखमीशी संबंधित आहे. इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सततच्या दाहक स्थितीला आणखी हातभार लावते आणि कर्करोगाची जोखीम आणखी वाढू शकते.

ते पुढे म्हणाले की,लठ्ठ व सहव्याधी असलेल्या व्यक्तींमध्ये ट्यमर हे जास्त आक्रमक दिसून येतात आणि यामुळे कर्करोगाचे उपचार अधिक गुंतागुंतीचे होतात. उदाहरण द्यायचे झाले तर लठ्ठ व्यक्तींमध्ये केमोथेरपीवाटे दिलेली औषधे चरबी मध्ये साठवून कालांतराने हळूहळू बाहेर येतात. ज्यामुळे हानीकारकता वाढून त्याची परिणामकारकता कमी होऊ शकते. त्याचबरोबर योग्य औषधांचे प्रमाण निश्चित करणे देखील अशा परिस्थितीत आव्हानात्मक होते आणि उपचारांना कमी प्रतिसाद मिळाल्यास परिणामांवर प्रभाव पडू शकतो.

# समशेरपूर-विरगाव-इंदोरी फाटा परिसरात बनावट दारूचा महापुर

## ७० मृत्यूंचे आरोप — बीट कॉन्स्टेबलवर निलंबन व चौकशीची जोरदार मागणी!





**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

अकोले (अहिल्यानगर): (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात समशेरपूर–विरगाव–इंदोरी फाटा परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून कथितपणे सुरू असलेल्या बनावट दारू व अवैध गुटख्याच्या व्यवसायामुळे किमान ७० जणांचा मृत्यू झाल्याचे गंभीर आरोप नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहेत. या प्रकरणात संबंधित तीन बीट कॉन्स्टेबलांच्या आशीर्वादानेच अवैध धंदे फोफावले असल्याचा दावा करत तत्काळ निलंबन, गुन्हे दाखल करणे, कॉल रेकॉर्ड (CDR) तपासणी आणि संपत्ती चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, इंदोरी फाटा, समशेरपूर आणि विरगाव परिसरात कोट्यवधी रुपयांची बनावट दारू व गुटखा खुलेआम विक्री होत असल्याचे चित्र आहे. अनेकदा निवेदने देऊनही प्रकरणे दाबली गेल्याचा आरोप होत असून, कारवाई झालीच तर मुख्य सूत्रधार (कथित 'किंगमेकर') बाजूला ठेवून कामगारांवरच गुन्हे दाखल केले जातात, अशी तक्रार आहे. परिणामी काही दिवसांनी पुन्हा तोच व्यवसाय तेजीत येतो, असा दावा करण्यात येतो.

निवेदनांमध्ये असा आरोप आहे की वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक येण्यापूर्वी अवैध व्यावसायिकांना फोन करून खबर दिली जाते. त्यामुळे संबंधित बीट कॉन्स्टेबलांच्या कॉल रेकॉर्डिंग व CDR तपासणी करून सत्य बाहेर काढावे, अशी मागणी होत आहे. तसेच या कर्मचाऱ्यांच्या अचानक वाढलेल्या संपत्तीची चौकशी व्हावी, असेही नागरिक सांगत आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, गुजरात व मध्यप्रदेशातून कंटेनरद्वारे गुटखा व दारूची वाहतूक या मार्गाने होत असल्याचे आरोप आहेत. रात्री उशिरा, सर्वसामान्य जनता झोपेत असताना सीड फार्म (अकोले), वसंत मार्केट परिसरातून पार्सलिंग केले जाते, असा दावा आहे. या हालचालींना पोलीस संरक्षण दिले जात असल्याचे आरोपही करण्यात येत आहेत. हा माल पुणे, अहिल्यानगर, नाशिक अशा जिल्ह्यांत वितरित होत असल्याचे सांगितले जाते.

नागरिकांचे म्हणणे आहे की इंदोरी फाट्यावर तळ ठोकून असलेला कथित 'किंगमेकर' वरिष्ठांपर्यंत सर्व 'ओके' असल्याचा दावा करत फिरतो. काही ठिकाणी माजी लोकप्रतिनिधी/स्थानिक मध्यस्थीद्वारे भागीदारी असल्याची चर्चा असल्याचेही सांगितले जाते. लोटे वस्ती, नोटे वस्ती, कोलार–घोटी रस्ता परिसरात माल लपवला जात असल्याचे आरोप आहेत.

गेल्या तीन वर्षांपूर्वी इंदोरी फाट्यावर एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे प्रकरण दाबले गेले का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. त्या प्रकरणात मुख्य सूत्रधारावर गुन्हा दाखल न होता प्रकरण मिटवले गेले, असा आरोपही निवेदनांत आहे.

या संपूर्ण प्रकरणात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घागरे व अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी तत्काळ लक्ष घालून स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निलंबन, गुन्हे दाखल करणे, संपत्ती चौकशी, CDR तपासणी यांसह अवैध साठे जप्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व पोलीस महासंचालक यांच्याकडे निवेदन, पुरावे व नमुने सादर करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. समशेरपूर व सीड फार्म परिसरात लपवलेला अवैध साठा तातडीने शोधून काढावा, अशी मागणीही करण्यात येत आहे.

# पांडुरंगाच्या सेवेत दर्शनाचा अलौकिक अनुभव - आदिनाथ जोशी

## अर्बन बँक कॉलनीतील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा २९ वा वर्धापन दिन भक्तिभावात साजरा



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पांडुरंगाच्या सेवेमुळे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाचा अलौकिक,समाधानकारक व अविस्मरणीय अनुभव जोशी परिवाराला प्राप्त झाला असून, हा अनुभव केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित नसून संपूर्ण समाजाला भक्तीच्या मार्गावर नेणारा आहे, असे भावनिक व विचारप्रवर्तक प्रतिपादन विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचे आदिनाथ जोशी यांनी केले.

"सेवा, श्रद्धा आणि निष्ठा या त्रिसूत्रीवर पांडुरंगाची भक्ती उभी आहे. अहंकार न ठेवता, निस्वार्थ भावनेने केलेली सेवा हीच खरी उपासना आहे. विठ्ठल आपल्या प्रत्येक सेवकावर कृपादृष्टी ठेवतो. या मंदिराच्या माध्यमातून भाविकांना शांतता, समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळावी, हाच आमचा उद्देश आहे. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली वारीची परंपरा, वारकऱ्यांची निस्वार्थ सेवा आणि विठ्ठलनामाचा गजर यामुळेच समाज अधिक सुसंस्कृत, एकसंध व संस्कारक्षम राहतो," असेही ते यावेळी म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर रोडवरील अर्बन बँक कॉलनीतील हौशी विठोबा मंदिरात विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन भाविकांना घडते. दर एकादशीला येथे भाविकांची मोठी गर्दी होत असून, आषाढी वारीच्या काळात दिंड्यांमधील वारकरी या ठिकाणी येऊन भक्तिभावाने सेवा करतात. या मंदिराचा २९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त पहाटे श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीला विधिवत रुद्राभिषेक करण्यात आला.

सायंकाळी मंदिर परिसरात फुलांची मनोहारी सजावट करण्यात आली होती. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला. यावेळी झालेल्या महाआरतीला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घेतला.

कार्यक्रमात पाचवीत शिक्षण घेणारी स्वानंदी तुषार देशमुख हिने विठ्ठल-रुक्मिणी वरील अभंग व भक्तिगीते सादर करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात चिंब केले. तिच्या सुरेल गायनाने कार्यक्रमात विशेष रंगत आली असून, उपस्थित मान्यवर व भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात तिचे कौतुक केले.

या प्रसंगी श्री व सौ.प्रज्ञा अभिजीत जोशी, भार्गव जोशी, माजी नगरसेविका संगीता खरमाळे यांच्यासह परिसरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त सौ. आश्विनी राजेश, अध्यापक, स्मिता आशिष ब्रह्मे, अजय घोलप आदींच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

कार्यक्रमास नगरसेवक निखिल वारे, नगरसेविका वर्षा सानप,रोहन सानप,अमोल गाडे,रामकिसन देशमुख, प्रशांत खांडकेकर,अभय देशपांडे, मकरंद भट, पुरुषोत्तम जोशी, प्रवीण राजापूरकर सौ स्मिता रणदिवे,सौ शुभांगी निंबाळकर आदींसह विविध मान्यवरांनी उपस्थित राहून विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले यावेळी बोलताना त्यांनी,"अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मकता वाढते. भक्ती, सेवा आणि एकोप्याची भावना अधिक दृढ होते. विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या माध्यमातून सातत्याने होत असलेले उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहेत,"असे मत व्यक्त केले.

विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात, भक्तिभाव, सेवा आणि आनंदोत्सवाच्या वातावरणात मंदिराचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रवीण डोक्रस, गणेश भालेराव, प्रणव रेखी, शहाजी पांडुळे, संदीप यादव, सचिन गाडे,राजू कुलकर्णी आदींनी विशेष परिश्रम घेतले. या सर्वांचे आभार अभिजीत जोशी यांनी मानले.

## मिलन एंटरप्रायझेस व भैरवप्रसाद एजन्सी या फर्मचा जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने विशेष सत्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



GST 2.0 मधील बदल लागू झाल्यानंतर, ज्या व्यावसायिकांनी प्रामाणिकपणे करसवलतींचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवला आणि ज्यांचा रिकॉर्ड पूर्णतः स्वच्छ व त्रुटीविरहित होता, अशा व्यवसायांवर विशेष लक्ष देण्यात आले. या मूल्यांकनाच्या आधारे,सखोल विभागीय ऑडिट, पडताळणी व सर्व बाबींचा विचार करून देशभरातील GST 2.0 चे लाभ यशस्वीरित्या ग्राहकांपर्यंत पोहोचविणाऱ्या टॉप 100 सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये मिलन एंटरप्रायझेस व भैरवप्रसाद एजन्सी या फर्मची निवड करण्यात आली आहे. नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयामार्फत मिलन एन्ट्रप्रायजेस चे संचालक अतुल डांगे व सौ.दिपाली डांगे तसेच भैरवप्रसाद एजन्सीचे संचालक सुधीर लांडगे व सौ.भावना लांडगे यांना सन्मानित करण्यांत आले.याबद्दल जनकल्याण रक्त केंद्राच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष अभय मेस्त्री, प्रशासकीय अधिकारी सागर उंडे,सौ.स्मिता बडवे,डॉ. वसंत झेंडे,लेखा अधिकारी गजेंद्र सोनवणे, जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर,सोनाली खांडरे,अमित टकले,अनिता तरटे,प्रियंका अडागळे,किरण शिंदे, विनिता धामणगावकर, सचिन वडागळे, तेजस डांगे, वेदांत हरिश्चंद्रे आदी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना अतुल डांगे म्हणाले,राष्ट्रीय पातळीवर आमच्या कार्याची दखल घेतली जाणे, तिरंग्याखाली उभे राहून प्रामाणिकपणा व शिस्त या मूल्यांचे प्रतिनिधित्व करणे.हा सन्मान शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. ही गौरवपूर्ण उपलब्धी केवळ आमची नसून, आमच्या ज्येष्ठांचे आशीर्वाद, शुभेच्छुक,आमच्यावर विश्वास ठेवणारे प्रत्येक ग्राहक आणि आम्ही जपलेली प्रत्येक मूल्यप्रणाली यांची आहे.

## "मन जिंकलं तर जीवन जिंकलं; सरश्री यांचा जीवनमंत्र"


**पुणे : (समर्थ गांवकरी)**

तेजज्ञान फाउंडेशनतर्फे पुणे येथील मनन ज्ञान ध्यान केंद्र येथे आध्यात्मिक मार्गदर्शक सरश्री यांचे प्रेरणादायी प्रवचन उत्साहात पार पडले. "जीवनाच्या क्रिकेटमध्ये शतकी खेळी करून एक उत्कृष्ट डाव कसा रचायचा" या विषयावर त्यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण समाजमाध्यमांवर करण्यात आले होते. जगभरातील असंख्य श्रोत्यांनी या सत्राचा लाभ घेतला. 'शतकी खेळी' म्हणजे केवळ शंभर वर्षे जगणे नव्हे, तर दररोज स्वतःचा विकास साधत चेतनेच्या उच्च पातळीवर जीवन व्यतीत करणे होय, असे सरश्री यांनी स्पष्ट केले.

## किर्लोस्कर ब्रदर्सच्या तामिळनाडूतील कनियूर उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड (केबीएल), अग्रणी भारतीय बहुराष्ट्रीय अभियांत्रिकी कंपनी आणि द्रव व्यवस्थापन उपाययोजनांत पथदर्शक असलेल्या या कंपनीने, तामिळनाडूतील कनियूर उत्पादन प्रकल्पात नवीन फॅक्टरी इमारतीचे उद्घाटन या आठवड्यात केले. हे उद्घाटन जानेवारी १९२६ मध्ये भारतातील पहिला सेंट्रीफ्यूगल पंप उत्पादन व स्थापनेच्या १०० वर्षांच्या स्मरणपूर्तीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आले. नवीन फॅक्टरीचे डिझाईन उत्पादकता वाढवणे, कार्यक्षमता सुधारणे आणि प्रगत उत्पादन प्रक्रियांना सक्षम करणे यासाठी तयार करण्यात आले आहे. यामुळे केबीएल देशांतर्गत तसेच जागतिक वाढत्या मागणीची पूर्तता करताना गुणवत्ता मानकांमध्ये कोणतीही तडजोड होऊ देणार नाही.



उद्घाटनाबद्दल प्रतिक्रिया देताना किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेडच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक सुश्री रमा किर्लोस्कर म्हणाल्या, "कनियूरमधील ही नवीन फॅक्टरी भारताच्या मॅन्युफॅक्चरिंग स्ट्रेंथवरील आमच्या विश्वासाचा आणि भविष्याच्या तयारीचा पुरावा आहे. भारतातील पहिल्या सेंट्रीफ्यूगल पंप स्थापनेच्या १०० वर्षांचा टप्पा साजरा करताना, ही सुविधा नाविन्यपूर्ण आणि उच्च-गुणवत्तेच्या उपाययोजना पुरवण्याची आमची क्षमता अधिक बळकट करते तसेच ग्राहक मूल्य, मानव संसाधन सक्षमीकरण व राष्ट्रनिर्मितीशी असलेली आमची बांधिलकीही अधोरेखित करते." या सुविधेवरील सौर ऊर्जा प्रकल्प केबीएलच्या शाश्वततेच्या प्रयत्नांमधील महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे १२२.५ $tCO_2e$ इतका कार्बन उत्सर्जनात घट होणार असून स्कोप १ आणि २ उत्सर्जनामध्ये ८९% घट अपेक्षित आहे. नवीकरणीय स्रोतांमधून आता या सुविधेतील जवळपास ८०% विद्युत मागणीची पूर्तता होत असून, ऊर्जा कार्यक्षमता, दीर्घकालीन खर्च स्थैर्य आणि जबाबदार वाढ यांना चालना मिळत आहे. या उपक्रमामुळे वार्षिक सुमारे ₹२१.६४ लाखांची बचतही होणार आहे. कनियूरमधील ही नवीन फॅक्टरी भारता च्या मॅन्युफॅक्चरिंग स्ट्रेंथवरील आमच्या विश्वासाचा आणि भविष्याच्या तयारीचा पुरावा आहे. भारतातील पहिल्या सेंट्रीफ्यूगल पंप स्थापनेच्या १०० वर्षांचा टप्पा साजरा करताना, ही सुविधा नाविन्यपूर्ण आणि उच्च-गुणवत्तेच्या उपाययोजना पुरवण्याची आमची क्षमता अधिक बळकट करते तसेच ग्राहक मूल्य, मानव संसाधन सक्षमीकरण व राष्ट्रनिर्मितीशी असलेली आमची बांधिलकीही अधोरेखित करते."

## यूट्यब मालिकेमुळे नवीन व्यासपीठ - मेघराज राजेभोसले

### 'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं' या वेबमालिकेचा भव्य लॉन्च सोहळा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

चित्रपट, ओटीटी आणि टीव्ही या तीनही माध्यमांचा आपला प्रेक्षक वर्ग , आर्थिक गणित वेगवेगळे आहे. अनेकांना मालिका करायच्या आहेत मात्र टीव्हीच्या मर्यादा लक्षात घेता सर्वांना संधि मिळतेच असे नाही. आज मराठी मनोरंजन विश्व एक नवीन सुरुवात करत आहे ते म्हणजे यूट्यब मालिका, तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं या मालिकेमुळे मराठी कलाविश्वाला नवीन व्यासपीठ मिळेल असा विश्वास अखिल भारतिय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी व्यक्त केला. पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे आयोजित कार्यक्रमात 'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं; या पहिल्या मराठी यूट्यब मालिकेचा लॉन्च सोहळा उत्साहात संपन्न झाला, यावेळी राजेभोसले बोलत होते.



याप्रसंगी प्रसिद्ध गायक साजन बेंद्रे, सुप्रसिद्ध अभिनेते शिवभक्त सचिन गवळी, या वेबमालिकेचे निर्माते सर्जेराव गायकवाड आणि राम अश्रुजी पाटील , दिग्दर्शक ओंकार नागनाथ पिंपळे यांच्यासह मालिकेतील सर्व कलाकार व तंत्रज्ञ उपस्थित होते.

पुढे बोलताना मेघराज राजेभोसले म्हणाले, आपल्याकडे गुणवंत कलाकार अनेक आहेत, माध्यमांच्या मर्यादेमुळे सर्वांना संधि मिळत नाही या मालिकेच्या निमित्ताने एक नवीन व्यासपीठ कलाकारांना मिळेल, या मालिकेचे निर्माते त्यांचे आर्थिक गणीतही जुळवतील कारण निर्मात्याला त्यांचे पैसे रिटर्न मिळणे अत्यंत महत्वाचे असते. नव्या माध्यमावर ही संपूर्ण टीम मेहनत घेत आहे त्यांना निश्चित यश मिळेल, तसेच मालिकेच्या संकल्पनेचे कौतुक करत, मराठी डिजिटल माध्यमांसाठी ही मालिका मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी साजन बेंद्रे, सचिन गवळी, सर्जेराव गायकवाड, राम पाटील आणि दिग्दर्शक ओंकार नागनाथ पिंपळे यांनी आपल्या मनोगतातून मालिकेच्या निर्मिती मागील भूमिका विषाद केली. 'तुझ्याचसाठी - एक मन विखुरलेलं' ही पहिली यूट्यब मालिका येत्या 9 फेब्रुवारी पासून सोमवार ते शुक्रवार सायंकाळी 8 वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर सोनवणे यांनी केले.

## आयडीबीआय बँकेचा नफ्यात वाढीचा वेग कायम


**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आयडीबीआय बँके तर्फे त्यांच्या आर्थिक वर्ष २६च्या तिसऱ्या तिमाहीच्या आर्थिक निष्कर्शांची घोषणा करण्यात आली. आर्थिक वर्ष २६ च्या तिसऱ्या तिमाहीत निव्वळ नफा हा रु. १,९३५ कोटी झाला. एनआयएम हे ३.५२ टक्के होते. ठेवींचा खर्च हा २०२६च्या तिसऱ्या तिमाहीत ४.६२ टक्के झाला जो वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत हाच स्तर ४.६२ टक्के होता. सीआरएआर हा २४.६३ टक्के झाला वार्षिक तुलनेत ही वाढ २६५ बीपीएस आहे. रिटर्न ऑन अॅसेट्स (आरओए) हे वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत १.८३ टक्के होती जी वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत १.९९ टक्के होती. रिटर्न ऑन इक्विटी (आरओई) हे १४.४९ टक्के होती. निव्वळ एनपीए चे प्रमाण हे ३१ डिसेंबर २०२५ रोजी ०.१८ टक्के होते. निव्वळ एनपीए मध्ये सुधारणा झाली.

## प्रेक्षकांच्या भेटीला येतोय 'आफ्टर ओ.एल.सी'

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेचा विषय ठरलेला बहुप्रतिक्षित अॅक्शन चित्रपट 'आफ्टर ओ.एल. सी' अखेर आपल्या रिलीज डेटसह सज्ज झाला आहे. अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेला हा दमदार, अॅक्शन-पॅक्ड सिनेमा ६ फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच त्यातील तगडी अॅक्शन, रहस्य आणि थरारक दृश्यांनी प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. प्रत्येक फ्रेममध्ये वेगळी ऊर्जा आणि कथा उलगडण्याची उत्सुकता निर्माण करणारा 'आफ्टर ओ.एल. सी' हा सिनेमा प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव देणार आहे. या चित्रपटात कवीश शेट्टी, मेघा शेट्टी, शिवानी सुर्वे, विराट मडके, अश्विनी चवरे यांच्यासह अनेक मराठी कलाकारांची भक्कम टीम पाहायला मिळणार आहे.




प्रत्येक कलाकाराने आपल्या भूमिकेला न्याय देत चित्रपट अधिक प्रभावी केला आहे. थरार, रहस्य आणि जोरदार अॅक्शन यांचा उत्तम मेळ या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.कन्नड सिनेसृष्टीतील दिग्गज दिग्दर्शक सडागारा राघवेंद्र यांनी 'आफ्टर ओ.एल.सी' चे दिग्दर्शन केले असून, 'दिपक राणे फिल्म्स' आणि 'इंडियन फिल्म फॅक्टरी' यांच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे.

हा सिनेमा मराठी भाषेत प्रदर्शित होणार असल्यामुळे मराठी प्रेक्षकांमध्ये त्याबद्दल विशेष उत्सुकता आहे. दमदार कथा, जबरदस्त अॅक्शन आणि रहस्यमय प्रवास घेऊन येणारा 'आफ्टर ओ.एल.सी' ६ फेब्रुवारीपासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात पाहायला मिळणार आहे. थराराची ही सफर अनुभवण्यासाठी सज्ज राहा!

## सूर्यदत्त जीवनगौरव व राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या २८ व्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात येणारे 'सूर्यदत्त जीवनगौरव पुरस्कार' व सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार' घोषित करण्यात आले आहेत. येत्या शनिवारी (दि. ७) सायंकाळी ५.३० वाजता बंटारा भवन, बाणेर, मुंबई-पुणे महामार्ग येथे हे पुरस्कार सन्मानपूर्वक वितरित केले जाणार आहेत, अशी माहिती 'सूर्यदत्त' चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी 'सूर्यदत्त'च्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, मुख्य विकास अधिकारी सिद्धांत चोरडिया, जनसंपर्क व्यवस्थापिका स्वप्नाली कोगजे, सल्लागार समिती सदस्य जीवराज चोले आदी उपस्थित होते.

## अँथॉलॉजी 'हसरतें' तिसऱ्या सीझनसह सह पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटीने आपल्या लोकप्रिय अँथॉलॉजी हसरतें चा तिसरा सीझन जाहीर केला आहे. महिलांच्या मनातील भावना, न बोललेल्या इच्छा आणि शांत बंडखोरी यांचा शोध घेणाऱ्या या मालिकेचा नवा अध्याय प्रेक्षकांसमोर येत आहे. पहिल्या दोन सीझनच्या मोठ्या यशानंतर, सीझन 3 मध्ये गुदमरून टाकणारी वैवाहिक नाती, कठोर परंपरा, राजकीय डावपेच आणि भावनिक दुर्लक्षामुळे घडलेल्या आयुष्यांच्या कथा अधिक खोलवर मांडल्या आहेत.




गेल्या काही वर्षांत हसरतें ने सहसा न सांगितल्या जाणाऱ्या कथा मांडत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महिलांच्या इच्छा, ओळख आणि समाजाच्या बंधनांमधील संघर्ष प्रामाणिकपणे दाखवल्यामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या मनाला भिडली आहे. सीझन 3 मध्ये थ्रिलर, गुन्हेगारी आणि ड्रामा यांचा संगम असलेले सहा प्रभावी भाग आहेत. प्रत्येक कथा धाडसी, भावनिक आणि माणुसकीने भरलेली आहे. हसरतें सीझन 3 चे पहिले दोन भाग 22 जानेवारी रोजी प्रदर्शित झाले, त्यानंतर 27 जानेवारी रोजी आणखी दोन भाग आले, आणि शेवटचे दोन भाग 4 फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होतील.

हसरतें सीझन 3 मध्ये सहा प्रभावी कथा आहेत, ज्या महिलांच्या शांततेतून, संघर्षातून आणि आत्मजागृतीच्या प्रवासातून उलगडतात. हल्ला बोल या कथेत ज्योतीची गोष्ट आहे. ती छळ सहन करणारी पत्नी असून, तिला बाहुली म्हणून राजकारणात ढकलले जाते. हळूहळू ती स्वतःचा आवाज शोधते आणि नियंत्रणाविरुद्ध उभी राहते. ब्युटी पार्लर मध्ये लखनौची सलमा ही गरीब परिस्थिती, मातृत्व आणि दुर्लक्षित वैवाहिक नातं सांभाळताना दिसते. सुरक्षिततेसाठी तिला आपल्या सन्मानाची किती किंमत मोजावी लागते, याचा ती सामना करते. मिडनाईट ब्राइड ही कथा अनन्याची आहे. ती एक तरुण विधवा असून हवेलीतील कठोर नियमांमध्ये अडकलेली आहे. कला आणि एका अनपेक्षित व्यक्तीमुळे तिच्या दडलेल्या इच्छा आणि भावना समोर येतात. दो अनजाने मध्ये दोन अनोळखी व्यक्ती एकत्र येतात — एक छळ सहन करणारी पत्नी आणि खोट्या आरोपांमध्ये अडकलेला एक पुरुष. दंगलीने ग्रासलेल्या एका रात्रीत त्यांना थोडीशी आशा मिळते. गुपचूप रसोई मध्ये दुर्लक्षित अन्नलेखिका निर्मला, स्वयंपाकघराला बंडखोरीचं स्थान बनवते. तिथे तिला स्वतःची ओळख मिळते, पण त्याच वेळी धोक्यालाही सामोरं जावं लागते. शेवटी नया किरायेदार ही कथा स्मिताची आहे. पतीच्या अचानक गायब झाल्यानंतर तिच्या मनातील शांत ओढ दाखवली आहे. सततच्या देखरेखीखाली जगणाऱ्या तिच्या आयुष्यात एका तरुण संगीतकाराचं आगमन तिचं आयुष्य बदलून टाकते.

आपल्या भूमिकेबद्दल आणि कथेबद्दल बोलताना मोनालिसा म्हणते, "गुपचूप रसोई ही कथा आवाज न करता स्वतःसाठी उभं राहण्याबद्दल आहे. महिलांविषयी, त्यांच्या आत्मसन्मानाविषयी आणि स्वतःला प्राधान्य देण्याच्या महत्त्वाबद्दल बोलणाऱ्या भूमिका करायला मला खूप आवडतात. दडपशाही आणि अपमानाला सामोरे जाण्यापासून ते स्वयंपाकाच्या आवडीतून स्वतःचे आत्म-सन्मान शोधण्यापर्यंतचा निर्मलाचा प्रवास अनेक स्त्रियांना आपलासा वाटेल. ही कथा स्वतःला निवडण्याची, अनपेक्षित ठिकाणी ताकद शोधण्याची आणि स्वातंत्र्य आपल्या आतूनच सुरू होते याची जाणीव करून देणारी आहे."

नया किरायेदार मध्ये स्मिताची भूमिका साकारणारी चाहत पांडे म्हणते,"स्मिता भावनिकदृष्ट्या एकटी पडलेली आहे. तिला टीकेचा भार सहन करावा लागतो आणि ती असे आयुष्य जगत आहे जिथे तिच्या गरजा बऱ्याच काळापासून दाबल्या गेल्या आहेत. इच्छा आणि कर्तव्य, भीती आणि स्वातंत्र्य यांच्यातला तिचा अंतर्गत संघर्ष मला खूप भावला.